# ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी केंद्र,


# पालक महासंघ

## मागोवा व वार्षिक वृत्तान्त २०२०-२१




रुंद होत ती क्षितिजे आता प्रगतीसाठी किती
व्यवस्थापनी, राजकारणी, उद्योगी नच मिती
जी जी क्षेत्रे साद घालती यत्न तिथे पेरुनी
कस लावुनिया कर्तृत्वाचा ठसा नवा उमटवू ।।





Milind Dharwadkar
मनोज देवळेकर
Nachiket
गिरीश बापट



REDMI NOTE 7 PRO
PRASAD07
2021/3/18 17:16



# प्रस्तावना



नमस्कार, पालक बंधू-भगिनी आणि ज्ञान प्रबोधिनी कुटुंब. प्रथमच पालक महासंघाचा मागोवा आणि त्याबद्दलची अधिक माहिती आपल्या सर्वांसमोर घेऊन येत आहे. आपल्या सर्वांनाच कल्पना आहे कि पालक महासंघ गेली ८-९ वर्षे ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचा एक अविभाज्य घटक म्हणून काम करतो. या वृत्तातून तुम्हाला पालक महासंघ हा संघटन विभाग कसा उदयास आला, त्याची सुरुवातीची कार्ये त्यानंतर झालेली प्रगती, पालक महासंघ रचना, दीर्घ कालीन उद्दिष्टे याविषयी अधिक माहिती मिळेल. पालक महासंघ ही आता केवळ एक संघटना नसून एक कुटुंब बनले आहे. त्यातून विविध रुची असणारे अनेक पालक गट एकत्र आले काही खेळण्यात प्राविण्य असणारे, काही गिर्यारोहक, काही काव्यवाचन करणारे, अनेक उद्योजक, नोकरदार पालक, तसेच महिलांचा सखी गट, वाचन कट्टा असे अनेक पालक बंधू भगिनी एकत्र येऊ शकले. स्वयंस्फूर्तीने प्रेरित झालेला हा पालक गट आता विविध क्षेत्रात जसे कि शैक्षणिक, सामाजिक, उद्योग, आरोग्य, तंत्रज्ञान , क्रीडा आणि सांस्कृतिक विभागात बराच कार्यरत आहे. पालक महासंघ हा नेहमीच निगडी केंद्राचा एक भाग म्हणून काम करेल आणि शाळेच्या इतर उपक्रमातही मदतीला असेल. हे वृत्त वाचून इतर अनेक पालक बंधू भगिनी, इतर संघटन गट, ज्ञान प्रबोधिनी मधील तसेच बाहेरील इतर संस्था आमच्याशी जोडल्या जातील असा विश्वास वाटतो.

धन्यवाद,

मिलिंद धारवाडकर

(पालक महासंघ अध्यक्ष २०२०-२१)

## निवडक मनोगते



करोना बाधितांना मदत, गिरीदर्शन,अध्यापक पालक संघ क्रीडास्पर्धा, विविध विषयावर व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, उपासना, कर्मयोग गीता पठण व चिंतन, मनोहर सभागृह विस्तार बांधकामास मदत, आधुनिक तंत्रज्ञनाद्वारे जागृती इ.प्रसंगानुसार पालकांचा सहभा ग असल्याचे जाणवले व केंद्र प्रमुख  व प्राचार्य मा.श्री मनोजराव देवळेकर यांचेही आपण वेळोवळी सहकार्य व मार्गदर्शनही धेतल्याचे जाणवले. पालक महासंघाने ज्ञानप्रबोधिनी च्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यालया समोर एक आदर्श निर्माण केला की पालक-अध्यापक-विद्यार्थी समजून एकत्र येतात तेव्हा प्रगतीचा आलेख दृष्टीक्षेपात येतो. पालक महासंधास खूप खूप शुभेच्छा.

- श्री ज्ञानेश्वर सावंत

---

नमस्कार पालक महासंघाचे माजी अध्यक्ष श्री मिलिंदजी धारवाडकर यांनी आवाहन केल्याप्रमाणे अगदी



थोडक्यात माझे मनोगत देत आहे. पालक महासंघाची रचना निगडी केंद्रात आता चांगली स्थिरावली आहे. कोरोनाच्या काळात अनेक गोष्टी ठप्प झाल्या असताना पालक महासंघातर्फे 67 उपक्रम होतात; हा आकडाच खूप काही सांगून जातो. गेल्या वर्षी संघातर्फे जे जे उपक्रम झाले ते सर्व आम्हा अध्यापकां पर्यंत पोहचत होते. त्या सर्वांची योग्य ती दखल आमच्या विभागामार्फत घेतली गेली.

मला आवडलेला उपक्रम म्हणजे पालकांची पालकांसाठी झालेली व्याख्यानमाला. या उपक्रमातून अनेक तज्ज्ञ पालक सर्वांसमोर आले. त्यांना आपले विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. तसेच त्यांच्या माध्यमातून करियर बाबतची वेगवेगळी क्षेत्रही मुलांपर्यंत नकळतपणे पोहचली.

पालक संघाची सदस्य संख्या वाढत जावी आणि या वाढलेल्या शक्तीचा उपयोग समाजाच्या कारणी लागावा हीच शुभेच्छा.

- श्री शिवराज पिंपुडे



## मा. श्री. गिरीश बापट, संचालक, ज्ञान प्रबोधिनी

ॐ

गिरिश बापट
सौर ज्येष्ठ १७, शके ४३
०७/६/२१

श्री. मिलिंद धारवाडकर यांस
स्नेहपूर्वक नमस्कार.

एप्रिल-मे महिन्यात निगडी केन्द्रातर्फे चालवलेल्या कोविड मदत कार्यातील पालक महासंघाच्या मोठ्या सहभागाबद्दल मनोजरावांकडून ऐकत होतो. त्यासंबंधीचे समाधान तुमच्याकडे व्यक्त करावे असा विचार चालू होता. तेवढ्यात काल तुमचे विनंती-पत्र मिळाले.

गेल्या वर्षी मे महिन्यापासून पालक महासंघाने विविध विषयांवरील व्याख्यानमाला चालवली. कधी पाक्षिक, कधी मासिक अशी ती अजूनही चालू आहे. विषयांची विविधता आणि त्यामध्ये पालक वक्त्यांची मोठी संख्या ही जमेची बाजू आहे.

वर्ग-मित्र ही नवीन संकल्पना उपयुक्त वाटली. कोविड काळातही ती व्यवस्थित चालली याचा अर्थ त्याची गरज होती. येत्या वर्षासाठी इच्छुक वर्ग-मित्रांची संख्या वाढली ही त्या योजनेच्या यशाची पावती आहे.

पालक महासंघ हा फक्त पालक, पाल्य आणि निगडी केंद्र यांच्यामधला दुवा नाही. कोविड मदत-कार्यामुळे तो निगडी केंद्र आणि प्राधिकरणातील नागरिक यांच्या मधील देखील दुवा बनला आहे.

गीतारहस्य अभ्यासासारखा उपक्रम महत्त्वाकांक्षी आहे. तो देखील सातत्याने चालू राहिला याचा आनंद व्यक्त करतो. गणेशोत्सव आयोजनातला पालक महासंघाचा सहभाग, आता महासंघ निगडी केंद्राचा घटक झाल्याचे दर्शवितो.

महासंघाच्या नावातच 'संघटन' आहे. निगडी केन्द्राच्या संघटन प्रभागाच्या बैठकीमध्ये आणि निगडीच्या केंद्रीय विस्तारित समितीमध्ये पालक महासंघाचे प्रतिनिधी येऊ लागले ही महासंघाची संघटनात्मक प्रगती आहे.

एकूणच, असाधारण परिस्थितीमध्ये पालक महासंघाच्या कार्यकारिणीने उत्तम काम केले. त्यासाठी अभिनंदन! - आपला,

गिरिश श्री. बापट

**इच्छा तिथे मार्ग ...**

कोरोनाने घरात डांबून ठेवले असतानाही आपण वार्षिक , मासिक , साप्ताहिक उपक्रम उदा वर्ग मित्र , गीता रहस्य वाचन



, अभिवाचन कार्यशाळा ते पालकत्व कार्यशाळा अशा व अगदी संधी मिळताच प्रत्यक्ष वेल्हे भेट , बचत गट चे वस्तू विक्रीचे नियोजन ते तुंग किल्ले भेट अस नेहमीच्या गणेशोत्सव , क्रीडा महोत्सव पलीकडे चौफेर घोडदौड समिती सदस्य ना घेऊन केली व डिजिटल माध्यमातून पुढची भ्रमंती ही केली. अर्थातच हे सर्व करण्यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या गटासोबत स्वतः मिलिंद दादांनी उतरून काम केले त्यामुळे सदस्यांमध्ये निश्चितच एकत्र येऊन काम करण्याची भवना रुजली.

मदतीचा हात देण्याचा प्रयत्न पहिल्याच टप्प्यात आपल्याकडून झाला आता पुन्हा तो होईल ..

उपक्रम माध्यम कदाचित ऑनलाईन झाल्याने प्रत्यक्ष नवीन संवाद संपर्क वाढण्यास मर्यादा आल्या. तरीही उपक्रम , व्याखने , पालक समिती अशा विविध माध्यमातून आवर्जून संपर्क व संघटन करण्यास प्रयत्न झाले.

विकसता विकसता विकसावे,

वितरता वितरता वितरावे!!

**सौ राजश्री ओझर्डे**

**माजी अध्यक्ष आणि निगडी केद्रीय समिती सदस्य**

---

पालक महासंघाच्या उद्योग विभागांतर्गत 1 मे 2020 -कामगार दिनाचे निमित्त साधून ,स्वतःच्या कर्तृत्वावर यशस्वीरीत्या आपला व्यवसाय करत असलेल्या काही पालकांचा सत्कार आणि त्याच्याशी संवाद अशा कार्यक्रमाचे नियोजन चालू होते.या संवादातून त्यांचा प्रवास उलगडावा जेणेकरून तो 8 वी ते 10 वी चे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावा असा उद्देश होता. पण अचानक मार्च महिन्यापासून शाळा,कॉलेज बंद, जमावबंदी आणि नंतर कोरोना व्हायरस च्या वाढत्या सं सर्गामुळे पूर्ण lockdown. एक नवीनच अचानक ही समस्या सर्वांसमोर उभी राहिली होती.स्वतःच्या,कुटुंबाच्या काळजीपोटी घरी बसून राहणे भाग होते पण हळूहळू वाढत चाललेल्या शारीरिक,मानसिक आणि आर्थिक समस्येला कसे सामोरे जायचे हा प्रश्न सर्वानाच भेडसावत होता. अशा परिस्थितीमध्ये शांत बसतील ते प्रबोधिनीचे कार्यकर्ते कसे ?? दि.29 एप्रिल ला मा.देवळेकर सरांसोबत झालेल्या चर्चेतून असे ठरले की आपण 1 मे रोजी जो प्रत्यक्ष कार्यक्रम घेणार होतो त्याऐवजी 3 दिवसांचे याच पालकांचे व्याख्यानाचे सत्र घेऊया.मग अगदी 2 दिवसांतच घरात बसूनच या नवीन तंत्रज्ञानामार्फत व्याख्यानांचे तयारी केली ,कामाचे नियोजन करून हे व्याख्यानाचे सत्र सुरु झाले.आपल्याच या पालकांनी देखील एका फोनवर झालेल्या बोलण्यात या सगळ्याला सहमती दिली आणि आणि सद्यपरिस्थितीला कसे धैर्याने सामोरे जायचे याचे मार्गदर्शन केले.श्री.विजय नाईक यांनी कोरोनाकडे संधी म्हणून कसे पाहूया,श्री.सतीश पवार यांनी रोजगार

विश्वातील आव्हाने आणि संधी,श्री.नाविनचंद्र बोऱ्हाडे यांनी शेती क्षेत्रातील आव्हाने व संधी याचे सहज सोप्या भाषेत सर्वांना मार्गदर्शन केले.



याला मिळणार पालकांचा प्रतिसाद ,सहभाग यावरून असे जाणवले की असे बरेचसे विषय आहेत त्यामुळे समाजात संभ्रम आहे,ताण आहे मग अशा व्याख्यानाचा उपयोग होत आहे तर ही व्याख्यानमाला आपण चालू ठेवली पाहिजे मग आम्ही 9 मे पासून प्रत्येक शनिवारी आणि रविवारी व्याख्याने सुरू ठेवली ज्यात या परिस्थितीतील शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आरोग्य कसे जपावे,सामाजिक भान, पर्यावरण,निसर्ग संवर्धन, 20 कोटींची सरकारची योजना नेमकी काय आहे त्याचा जन सामान्यांसाठी कसा फायदा आहे असे विषय घेतले गेले,पुढे पालकांची उत्सुकता आणि मागणी लक्षात घेऊन सांस्कृतिक, कला, साहित्य ,पालकतत्व यावरची देखील व्याख्याने घेण्यात आली.प्रबोधिनीचे संचालक मा.गिरीशराव बापट, निगडी केंद्राचे प्रमुख मा.मनोजराव देवळेकर यांनी देखील या व्याख्यानमालेत सहभागी होऊन सर्व पालकांना मार्गदर्शन केले,संवाद साधला याचा आम्हा पालकांना विशेष आनंद झाला.

Lockdown संपल्यावर ही व्याख्यानमाला पाक्षिक घेण्यात आली.

साधारण 2021 च्या फेब्रुवारी,मार्च पासून पुन्हा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढून, या कोरोनाचा दुसऱ्या लाटेमध्ये थोडी थोडी बसत असलेली घडी परत विस्कळीत झाली या वेळी लोकं मानसिक तणावाखाली जास्त आले त्यामुळे खूप नकारात्मकता सगळीकडे जाणवू लागली. या परिस्थितीमध्ये आपल्या चालू असलेल्या व्याख्यानमालेतून आपण काही करू शकू का? असा विचार चालू असताना मा.देवळेकर सर आणि पालक महासंघाचे आजी,माजी अध्यक्ष ,मिलिंद धारवाडकर , राजश्री ओझर्डे आशा सगळ्यांच्या चर्चेतून आपण या मे महिन्यात काही हलके फुलके विषय घेऊन वातावरण सकारात्मक करता येईल का याचा प्रयत्न करूया असे ठरले.मग मे महिन्याच्या पाचही रविवार ,हास्यरंग या श्रृंखलेअंतर्गत कार्यक्रम घेण्याचे नियोजन झाले.यासाठी 10 जणांचा गट उत्साहाने काम करत होता.पालकांच्या सहभागानेच या श्रृंखलेत आम्ही विनोदी कथा वाचन,विडंबन काव्य ,छोटे छोटे विनोदी किस्से यांचे सहकुटुंब सादरीकरण, पु.ल.देशपांडे,दिलीप प्रभावळकर यांच्या साहित्याचे वाचन असे हलके फुलके पण दर्जेदार कार्यक्रम सादर केले. ३० मे रोजी २०२१ यावर्षीच्या व्याख्यानमाला सत्राचा समारोप झाला.

या पूर्ण वर्षभरात विविध क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक पालक, पालक महासंघात जोडले गेले.समाजात कशीही परिस्थिती असली,कुठलेही संकट आले तरी ज्ञानप्रबोधिनी शाळा आणि पालक महासंघ आपल्या सदैव सोबत आहे याची जाणीव सर्व पालकांना होत आहे याचा विशेष आनंद आम्हाला आहे.

**सौ.चारुता देशपांडे**

व्याख्यानमाला प्रमुख २०२०-२१,

उपाध्यक्ष,पालक महासंघ

**आव्हानांच्या गगनामध्ये मुक्त आम्ही फिरणार....**

या ओळींचा प्रत्यक्ष अनुभव २०२० या साली कमीअधिक प्रमाणात सर्वांनाच नक्कीच आला असणार ...कारण केवळ



घराबाहेर पाऊल ठेवण्यासाठीही अनेक आव्हान आ वासून उभी होती !! Lockdown, social distancing, online activities या शब्दांची नव्यानेच आपल्याला ओळख झाली होती. ही बंधनं पाळणे ही प्रत्येकालाच क्रमप्राप्त होते.

साहजिकच अशाच अवघड परिस्थितीत मागील वर्षीच्या पालक महासंघालाही आपली वाटचाल करावी लागली..

यामध्ये पालकांशी प्रत्यक्ष गाठीभेटी , सुसंवाद याचा समावेश जरी कमी झाला असला तरीही ऑनलाईनच्या माध्यमातून अनेक नवनवीन उपक्रम आखले गेले... यातून सर्वाना एकत्रितपणे बांधून ठेवण्याचा (समान धाग्याने) प्रयत्न ही केला गेला. पालक महासंघ आयोजित व्याख्यानमाला हा त्यापैकीच एक अतिशय चांगल्या उद्देशाने सुरु केलेला आणि यशस्वी ठरलेला उपक्रम होय. गेल्या वर्षभरात अनेक उत्तमोत्तम विषयांवर यामध्ये पालकांसाठी ( आणि परिसरातील नागरिकांसाठीही हे विशेष) सुमारे २७ व्याख्याने झाली ..अगदी प्लास्टिक , पर्यावरण, बांबू संवर्धन यापासून ते अगदी उद्योजकता , जीवनातील कलेचे महत्व, भाषेचे महत्व अशा वेगवेगळ्या विषयांवर तज्ज्ञांनी आपल्या सर्वांचेच प्रबोधन केले... याशिवाय पालकांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यशाळा, भाषेचे वर्ग , गेल्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने गीतारहस्य अभ्यासवर्ग , अभिवाचन कार्यशाळा, असे असंख्य उपक्रम राबविले गेले... विशेष म्हणजे सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या क्रीडा स्पर्धेचेही छोट्या प्रमाणात का होईना (विशेष काळजी घेऊन आणि नियमांना अनुसरून ) आयोजन केले गेले.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे यातल्या कोणत्याही एकाच गोष्टीत, उपक्रमात स्वतःला न अडकवून घेता, केवळ मार्गदर्शकाची भूमिका न बजावता पालक संघाचे अध्यक्ष श्री मिलिंददादा धारवाडकर यांनी जवळजवळ प्रत्येक गटात स्वतः उतरून काम केले..मग ते अगदी वर्गमित्र असो, उद्योजकता विभाग असो,तंत्रज्ञान असो , व्याख्यानमाला असो की सांस्कृतिक विभाग ...प्रत्येक गटात त्यांचा उत्साही सहभाग होता... ही गोष्ट कौतुकास्पद !!!

मला वाटतं या वर्षी जरी प्रत्यक्षात भेटीगाठी आणि कार्यक्रमांचे नियोजन जरी कमी असले तरीही अशा अनेक वेगवेगळ्या उपक्रमातून आणि ऑनलाईन माध्यमातून आपण अनेक नवीन लोकांपर्यंत , पालकांपर्यंत पोहोचलो गेलो... केवळ क्रीडा स्पर्धेपूरते मर्यादित न राहता विद्यालयातील अनेक अध्यापक, पालक आणि या अनुषंगाने पाल्यांशीही पालक संघातर्फे काय काय उपक्रम चालतात. याची माहिती पोहोचली गेली.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या कोविड हेल्पलाईन साठीही पालक संघाच्या माध्यमातून अनेक पालक स्वयंसेवक म्हणून जोडले गेले ...आणि सर्वांनी मिळून यासाठी खूपच सेवाभावीपणे आणि झोकून देऊन कार्य केले... म्हणजेच एका

ठराविक चौकटीत न अडकता पालक संघाने (या महत्वाच्या उपक्रमात अनेक महिला आणि पुरुष पालक नव्याने जोडले गेले ) सामाजिक भान राखून एक उत्तम आदर्श सर्वांसमोर मांडला हे नक्की!!!

याचबरोबर उन्हाळी शिबिरासाठी संवेद विभाग आणि मुक्तीसोपन विभागाच्या बरोबरीने आपल्या पालक संघाच्या सदस्यांनी ही यात भाग घेऊन शिबिराचे उत्तम नियोजन केले..

या पूर्ण प्रवासात मिलिंद दादांच्या या प्रयत्नांना पालक संघातील प्रत्येक सदस्यांनीही अगदी मोलाची आणि आश्वासक साथ दिली... कारण  गट म्हणून कोणतेही कार्य करताना ती जबाबदारी कोण्या एखादया व्यक्तीची नसून त्यात सर्वासमावेशकता असल्यास, सर्वांनी सर्वांना समजावून घेत मिळून मिसळून कार्य केले तरच त्या कार्याचे फल साध्य होते.. म्हणूनच मिलिंददादा आणि त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !! आणि या प्रवासात आ.श्री देवळेकर सरांनीही वेळोवेळी योग्य मार्गदर्शन केले आणि प्रत्येक उपक्रमास पाठबळ दिले ... हे विशेष उल्लेखनीय !!!

या प्रवासात प्रत्येकाकडूनच खूप काही नवीन गोष्टी शिकता आल्या ...जसे की गटबांधणी , पूर्वनियोजन , लोकसंग्रह , आणि अशा कित्येक गोष्टी... यासाठी सर्वांचीच ऋणी आहे !! धन्यवाद !!

**सौ माधवी पोतदार.**

सचिव आणि सांकृतिक विभाग प्रमुख, पालक महासंघ

---






## पालक महासंघ मागोवा

सौ वैशालीताई तळेगावकर यांच्या पाठींब्याच्या आधारे आणि २०१२ सालच्या बालभवन पालक समिती सदस्यांच्या अनुमोदनाने सुरुवातीस पालकांच्या क्रीडास्पर्धा घेऊन सर्व पालकांना एकत्र आणूया असे ठरले. त्या वर्षीच्या क्रिकेट क्रीडा स्पर्धा खुपच यशस्वी झाल्या, परंतु ह्या स्पर्धा फक्त बालभवन गटासाठीच होत्या. त्या नंतरच्या शोध-बोध बैठकीत, मा. मनोजराव देवळेकर सर यांच्या मार्गदर्शनानुसार आपण सर्व पालकांसाठी एक गट तयार करूयात अशी कल्पना समोर



आली आणि या गटाची सुरुवात झाली. तेव्हा सक्रीय असणारे विवेक केळकर, भालचंद्र कासार, सचिन संकपाळ, कुंदन चौधरी, विजय नाईक, किशोर जाधव, नवनाथ नरळे, नितीन बारणे, शंकर घोलप, विलास खांडेकर, जयदीप जेजुरीकर, डॉ. राहुल वाणी, मिलिंद लोखंडे, मिलिंद धारवाडकर आणि स्वतः मनोजराव देवळेकर असा छान पालक गट  गट तयार झाला, सक्रीय कार्यकर्ते आणि नवीन मित्रही मिळाले. आपल्या मुलांना शाळेत सोडले कि त्याकाळी गेट वर आम्ही बराच वेळ गप्पा मारत असू. त्यातूनच क्रीडा स्पर्धेमुळे लक्षात राहिलेले काही खेळाडू आम्हाला दिसत. असा गेट वरचा गट हळूहळू मोठा होऊ लागला. कधी कधी सर ही आमच्याशी गप्पा मारू लागले. आमच्यात चांगल्या विषयांवर चर्चाही होऊ लागल्या. मग दर



गुरुवारी आम्ही आणि सर मैदानात बसून पुढे काय करावे पालक संपर्क कसा वाढवूया यावर विचार करू लागलो.  त्याचवेळी आमच्या समोर नाव आले ते निलेश दादा गावडे यांचे. उत्तम गिर्यारोहक, इतिहासाची आणि गड किल्ल्यावर सतत भ्रमण करणारे अशी यांची ख्याती होती. निलेश दादांनी सूचना केली चला आपण एखादा किल्ला बघायला जाऊ. कल्पना सगळ्यांनाच आवडली, प्रश्न होता कोणता किल्ला आणि पालकांना जमेल का या वयात? कारण आम्हाला पालक संपर्कही वाढवायचा होता त्यामुळे सोपं काहीतरी करावे असे मनात होते. शेवटी सोपे आहे जमेल असे म्हणत ढाक बहिरी येथे जाऊयात असे ठरले. माझ्या सारख्या काहींनी तर गिर्यारोहण त्यांच्या शाळेत किवा महाविद्यालयातच सोडले होते त्यामुळे आता परत करणे कसे होईल माहित नव्हते आणि त्यातूनही काही माहिती काढली तर हे प्रकरण फार अवघड आहे हे उघड्या डोळ्यांनी दिसत होते. पण संघ भावना, एकत्रित जायचे आहे सर्वांना घेऊनच जायचे आहे असे ठरले. त्यानुसार सर्व वर्गांवर निरोप



गेले आणि नाही म्हणता म्हणता आम्ही जवळपास ५० सीटर गाडी बुक केली. जेव्हा १००-१५० लोकांशी संपर्क होतो तेव्हा काही सम विचारांची माणसे जोडली



जातात हा पहिला धडा आम्ही या नियोजनातून घेतला. दिवस उजाडला , गाडी निघाली आणि चालायला सुरुवात देखील झाली, गप्पांमध्ये, गाणी म्हणत हळू हळू सरळ वाट संपून कधी चढण सुरु झाले कळलेच नाही. दमछाक व्हायला सुरुवात झाली आणि दुसरा धडा मिळाला, जसा गाडीला स्टार्टर लागतो आणि मग काही काळ लोटल्यावर गाडी गरम होते तसेच याचे आहे पुढच्या ३० मिनिटांत संपूर्ण शरीर गरम होईल आणि तुम्हाला चालायला काहीच वाटणार नाही. अशी

सूचना निलेशरावांकडून मिळताच शिवाजी महाराज कि जय म्हणत आम्ही सर्व जन पुढे मार्गस्थ झालो. बरेच अंतर गेल्यावर अगदी एक माणूस जाईल अशी घळ होती, पाय इकडे तिकडे सरकला कि दरीच दिसत होती. सर्वांना मदत करत करत तोही पल्ला आम्ही पार केला आणि शेवटी सर्वजण किल्याच्या वर गुहेमध्ये एक मंदिर होते तेथे विसावलो. एक विलक्षण आनंद आणि उत्साह वाटत होता. काही काहींनी तर अगदी १०-१२ वर्षांनंतर ट्रेकिंग चा अनुभव घेतला. अशा तर्हेने आमचा पहिला किल्ला सर झाला आणि तोही अवघड असा !!!

या पहिल्याच उपक्रमातून आम्हाला अनेक नवीन मित्र मिळाले सुधाकर राव , विशु, सरकाळे दादा, जयदीप, विवेक कुलकर्णी आणि बरेच सारे. पुढील चार वर्षे आम्ही असेच विविध गड सर केले राजगड, रायगड, K2S (कात्रज ते सिंहगड रात्रीचा ट्रेक) त्याचबरोबर गणेशोत्सव आणि दरवर्षीच्या क्रीडा स्पर्धा सुरूच होत्या.



आमच्या आई पालकांचा आणि मुलांचाही एक छान गट तयार होत होता. आम्ही सर्व जण आता बालभवन सोडून प्राथमिक विभागात आलो. गुरुवारची मैदानावरील पालक संख्या ही आता वाढू लागली होती. सरांच्या मार्गदर्शनात आम्ही सर्व जण नवीन गोष्टी शिकत होतो. एकदिवस सर म्हणाले, आता आपल्याला औपचारिक गट करण्यास हरकत नाही. त्याची काही तरी रचना असावी आणि त्याचे एक छान नाव असावे. मग सर्वानुमते पालक महासंघ असे नाव ठरले आणि आणखी काही वर्षे संपूर्ण रचना न करता एक अध्यक्ष असावा आणि त्याच्या बरोबरीने सर्व जण काम करत राहू अशी कल्पना पुढे आली. या गेल्या काही वर्षांमध्ये म्हणजे २०१२ ते २०१६ सालापर्यंत प्रसाद दगडे, आनंद देशमुख, राहुल दिकोंडा, लक्ष्मण भणगे, सुहास पाटील, गुलाब वाल्हेकर, धनंजय पाठक, अर्जुन दलाल, सचिन संकपाळ, श्रीराम कुंटे, श्रद्धानंद वारे, शुभांगीताई बुरसे, शुभांगीताई निकम, योगीनीताई देशमुख, हर्षदाताई माळी, चारुता ताई देशपांडे, वर्षाताई नरळे, सीमाताई संचेती, अस्मितताई चौधरी, प्रतिभाताई दलाल, राजश्रीताई ओझर्डे, श्वेताताई दामले, प्रतीक्षाताई साळसकर, आणि इतर महिलांचाही एक मोठा गट अशी इतर बरीच नावे आम्हाला साथ देत होती.

गट मोठा होत होता , अनेक पालक जोडले गेले, शालेय विभागातही पालक समितीमध्ये आम्ही सक्रीय होतो. स्वविकासातून सामाजिक विकासापर्यंत पोहोचण्याचा संकल्प घेतला होता. अशाच चांगल्या गटातून हे शैक्षणिक वर्षं २०१५-१६ लक्षात राहते ते गणेशोत्सवातील सामाजिक कार्यामुळे आणि विविध इतर उपक्रम आम्ही उत्साहाने करत



गेलो. शाळेतील गणेशोत्सवाचे संपूर्ण आयोजन विविध विभागांच्या सहायाने पार पाडले. मुख्य जबाबदारी: सजावट, प्राणप्रतिष्ठा, नित्य आरती, मिरवणूक, विविध कार्यशाळा, कचऱ्याचे व्यवस्थापन आणि सेंद्रिय खत निर्मिती शाडूमातीच्या गणेशमूर्ती बनविणे प्रशिक्षण, पाककृती, पौरोहित्य, विविध व्याख्याने - सार्वजनिक उत्सव आणि पर्यावरण सार्वजनिक उत्सव- दासह आणि दिशा जागतिक तापमान वाढ आणि आपली भूमिका महिला आणि बाल सुरक्षा

ख्यातनाम वक्त्यांचे विचार ऐकण्याची सर्वांना संधी उपलब्ध करून दिली. आपल्या पालकातीलच श्री शेखर बेळूंखे यांचे कुनिकोनुर गाव. या दुष्काळग्रस्त गावासाठी निधीसंकलन आणि त्या निधीतून गावकऱ्यानां बरोबर घेऊन प्रत्यक्ष बंधाऱ्याचे बांधकाम यशस्वीरीत्या पूर्ण  केले.

**इतर उपक्रम :**

फळे-भाजी विक्री उपक्रम, कागदी आकाशकंदील बनविणे, मातीचे किल्ले बनविणे, आरोग्य, साहस, पर्यावरण आणि सहभाग, शाळेच्या गिर्यारोहण व इतर सहलींच्या आयोजनात प्रत्यक्ष सहभाग, घोराडेश्वर- वृक्षारोपण, पालकांच्या योगा वर्ग, साळूम्ब्रे शाळेच्या रौप्य महोत्सवानिमित्त शाळेला भेट, आधार कार्ड नोंदणी कार्यक्रमामध्ये कृतीशील सहभाग, मा. आप्पा पेंडसे अभिवादन यात्रेत लक्षणीय सहभाग, विद्यार्थी शिक्षकांच्या बरोबर आषाढीवारी निगडी ते पुणे सहभाग, घरकुल निवासी शिबिरास भेटी, गडकिल्ले, पक्षीनिरीक्षण, आकाश निरीक्षण, देवराई सहल- आयोजन, वाहतूक गस्त उपक्रमात कृतीशील सहभाग, चाकण येथील  अनाथाश्रामास दूध, धान्य आदींचा पुरवठा

**‘सखी प्रबोधिनी’ महिला पालकांच्या गटाची सुरुवात आणि उपक्रम :**

पुस्तक भिशी

व्याख्यान

अनुभव कथन

व्यायाम



आणि क्रीडास्पर्धा मध्ये महिला गटाचा उल्लेखनीय सहभाग





अशाप्रकारे पालक गटाला एक मोठे स्वरूप येत होते, बरेच जण स्वेच्छेने समाजकार्यासाठी, पालक आणि विद्यार्थांच्या हितासाठी पुढाकार घेत होते, उपक्रमात सहभागी होत होते. या संपूर्ण गटाचे नेतृत्व कोणीतरी करावे असे चर्चेत आले आणि आपल्या पालकातूनच दर वर्षी एक अध्यक्ष नेमणूक होईल असे निश्चित केले. त्याप्रमाणे खालील सदस्यांनी पालक महासंघाची अध्यक्ष पदाची धुरा सांभाळली.

**४ - प्रथम अध्यक्ष, क्रीडा स्पर्धा आणि पालक संपर्क**

गणेशोत्सव आणि क्रीडास्पर्धा यामुळे अनेक पालक जोडले गेले, शालेय विभागातही सक्रीय असल्याने कोणीतरी एक



संपर्क प्रमुख असावा आणि या मोठ्या गटाचे नेतृत्व करणारा गट प्रमुख किंवा कार्यवाहक म्हणून कोणीतरी काम करावे असे ठरले. त्याप्रमाणे आपल्यातील काही मंडळींकडे विचारणा झाली आणि एकमताने सर्वांनी मिळून हे नेतृत्व दरवर्षी करूयात असे निश्चित झाले. श्री नवनाथ नरळे यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ सालच्या अध्यक्ष पदासाठी संमती दाखवली आणि त्याला सर्वांनी होकार दिला. नवनाथ नरळे म्हणजे लक्ष्मी किचन चे सर्वेसर्वा आणि किचन साहित्य, त्याचे स्वरूप, डिझाईन यामध्ये अगदी पारंगत आणि पालक महासंघाच्या कार्यात अगदी आतासुद्धा उत्साहाने सहभागी होणारे असे आहेत.

नवनाथ रावांच्या नेतृत्वाखाली आम्ही वरील नमूद केलेले बरेच उपक्रम चालू ठेवले आणि विशेषतः गणेशोत्सव मध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. नेहमी प्रमाणे क्रीडास्पर्धा देखील दरवर्षी प्रमाणे उत्तम रीतीने पार पडल्या.







**५ - पालक महासंघ आणि भव्य क्रीडास्पर्धा**



आपल्या सहजवाणीने सर्वांचे नेतृत्व करीत नवनाथ रावांनी पालक महासंघाची औपचारिक पायाभरणी केली. नवीन वर्षाची सुरुवात झाली, सरांनी विचारले पुढील अध्यक्ष कोण ? सर्वांच्या नजरा अनुभवाने श्रेष्ठ, ला डके आणि उच्चशिक्षित किशोर रावांकडे वळल्या. पेशाने CA असणार्या श्री किशोर जाधव यांनी देखील शैक्षणिक वर्ष २०१७ -१८ साठी संमती दाखवली. किशोर रावांच्या कार्यकाळात पालकांसाठी अनेक चांगले उपक्रम झाले, आपले नित्याचे गणेशोत्सव, क्रीडास्पर्धा याबरोबरच हिमालयातील गिर्यारोहण यशस्वी झाले.







## ६ - पालक महासंघाची औपचारिक रचना बांधणी

पालक महासंघाची २ वर्षे झाली आणि पालक महासंघ गट आता आणखी प्रोफेशनल होऊ पाहत होता. या गटातील



वयाने आणि अनुभवाने जेष्ठ असणारे श्री. विवेकराव केळकर यांचे नाव शैक्षणिक वर्ष २०१८ -१९ साठी समोर आले. विवेकरावांनी देखील आपले नेहमीचे उपक्रम सांभाळत काही निधी संकलनाचे मोठे कार्यक्रम यशस्वी केले. सर्वात महत्वाचे म्हणजे पालक महासंघ एक संस्था म्हणून त्याची काही रचना असावी असे सुचविले आणि त्याप्रमाणे अध्यक्ष , उपाध्यक्ष , सचिव, कोषाध्यक्ष , याशिवाय शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक, क्रीडा असे विभाग व त्याचे प्रमुख असावेत असे सुचविले. पालक महासंघ औपचारिक रचनेमुळे बरेच पालक जोडले गेले आणि पालकांना आपल्या आवडत्या विभागात काम करण्याची संधी मिळाली.







## ७ - प्रथम महिला अध्यक्ष आणि महिला गट बांधणी

पालक महासंघाचे हे ८ वे वर्ष. शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा व सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमांमधून पालकांचे संघटन



तसेच शालेय व्यवस्थापनात विद्यार्थ्यांच्या शिक्षणेतर उपक्रमांमध्ये शाळेला सक्रिय मदत करणे असे पालक महासंघाचे काम चालते. शैक्षणिक वर्ष २०१९ -२० च्या अध्यक्षा सौ. राजश्रीताई ओझर्डे यांनी पदभार स्वीकारला. कृतिशील वार्षिक उपक्रमांबरोबरच नियमित साप्ताहिक उपक्रम, बैठका, शोध बोध बैठक, चर्चा, परिसंवाद, महिला संघटन वाढवण्यासाठी प्रयत्न केले गेले. यंदा पहिल्यांदाच नवरात्री निमित्त पारंपरिक खेळ व महाभोंडला आयोजित करण्यात आला होता. या वर्षीच्या जुलै, ऑगस्ट महिन्यात महापूराचे संकट महाराष्ट्रावर आले होते. अशावेळी कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोला तालुक्यात प्रत्यक्ष पूरग्रस्त भागात जाऊन तेथील बांधवाना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू तसेच मानसिक आधार देण्याचे मोलाचे काम निगडी ज्ञानप्रबोधिनीने केले त्यात्त सर्व विभागातील साधारण १५० पालकांचा प्रत्यक्ष सहभाग होता.  जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ईनरव्हील क्लब, निगडी आणि पालक महासंघातर्फे महिला कृतज्ञता सोहळा साजरा केला. कोरोना च्य पहिल्या lockdown काळात उद्योजक विभागाने ऑनलाईन माध्यमातून १ मे पासून विविध अनुभवी पालकांचे परिसंवाद आयोजित केले.



## ८ - पालक महासंघ (“online”) अध्यक्ष आणि संघटन

पालक महासंघाचे हे ९ वे वर्ष, शैक्षणिक वर्ष २०२० -२१ कोरोना मुळे अर्थातच online!!! इन्फोसिस मध्ये कार्यरत



असणारे, online माध्यमांचा अनुभव असणारे आणि गेली ९ वर्षे पालक महासंघात सक्रीय , सचिव, कोषाध्यक्ष , उपाध्यक्ष असे सर्व पदांचा अनुभव असणारे CA श्री मिलिंद धारवाडकर यांची यावर्षी सर्वासहमतीने पालक महासंघाच्या अध्यक्ष पदावर नेमणूक झाली. या वर्षी प्रत्यक्ष न भेटता सर्व उपक्रम चालू ठेवणे व त्यात आणखी भर घालणे,त्याचबरोबर कोरोनासारख्या महामारीला सामोरे जात , सकारात्मकता पसरविणे, जास्तीत जास्त पालकांपर्यंत पोहोचणे, विद्यार्थांचे online शिक्षण त्यात अध्यापकांना मदत करणे, नियमित बैठका , उपासना , सर्व विभागातील उपक्रम चालू ठेवणे, सदस्यांचा आत्मविश्वास सतत वाढता ठेवणे अशी अनेक आव्हाने डोळ्यासमोर होती. हे सर्व सांभाळत आणि स्वतः वेळप्रसंगी पुढे होऊन उपक्रम यशस्वी करणे त्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याची गरज भासली. या वर्षीचे उपक्रम बघता सर्व काही online असूनही कोणत्याही वर्षापेक्षा जास्त उपक्रम आणि तेही यशस्वी , हजारोंच्या संखेत लोकांपर्यंत पोहोचले. त्याचे सविस्तर वृत्त पुढे येईलच. या वर्षात मला साथ दिलेल्या माझ्या संपूर्ण कार्यकारिणी सदस्यांचे आणि मार्गदर्शकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.






# पालक महासंघ ओळख आणि रचना

पालकांच्या सर्जनशीलतेला आणि स्वयंसेवितेला संधी देणारे मुक्त व्यासपीठ!!

ज्ञान प्रबोधनी अर्थात देश प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर काम करणारे विद्यार्थी घडवणारी संस्था. अशा संस्थेच्या शाळेत जर आपला पाल्य शिकत असेल तर पालकांची आपसूकच जबाबदारी असते मुलांना घरात तसेच समाजातही असे पूरक वातावरण देणे. हेच मुख्य उद्दिष्ट ठेवून निगडी केंद्रामध्ये क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून पालक महासंघाची स्थापना झाली.

**संस्थेच्या उद्दिष्टांशी सांगड घालत पालक महासंघाची उद्दिष्टे ठरवली आहेत.**

१) पाल्यांसाठीच्या शिक्षणेतर उपक्रम आयोजनात शाळेला साहाय्य.

२) पालकांच्या व्यक्तिमत्व विकासनासाठी उपक्रम घेणे.

३) सामाजिक बांधिलकीची जाणीव असणारा पालकांचा गट उभा करणे/जोडणे.

वरील उद्दिष्टांना अनुसरून वार्षिक उपक्रमांचे नियोजन पालक महासंघाची कार्यकारी समिती करते. कार्यकारी समितीमध्ये सर्व विभागांचे (बालभवन, घरकुल, मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकूल) पालक स्वेच्छेने किमान एका वर्षासाठी सहभागी होतात.

कार्यकारी समितीद्वारे उपक्रमांच्या माध्यमातून, सर्व विभागातील पालकांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात स्वेच्छेने काम करण्यासाठी नेहमी आवाहन केले जाते.

**कार्यकारी समिती रचना.** (संघटन विभाग , निगडी केद्रप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली)

अध्यक्ष –

उपाध्यक्ष –

सचिव –

खजिनदार –

विविध समित्या – सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा, उद्योग, तंत्रज्ञान, संपर्क

मार्गदर्शक – सर्व माजी अध्यक्ष आणि सक्रीय अनुभवी सभासद

*वैयक्तिक पालकत्वाच्या भूमिकेतून सामजिक पालकत्वाच्या भूमिकेत जाण्याची संधी व त्यासाठी स्वतःचा विकास करण्याचा नवा दृष्टिकोन देणार व्यासपीठ म्हणजे आपला आजी माजी पालकांचा पालक महासंघ.*




मा. श्री. मनोज राव देवळेकर सरांची प्राचार्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल सरांना अनेक अनेक शुभेच्छा !!



# सविस्तर वार्षिक वृत्तांत (शैक्षणिक वर्ष २०२०-२१)

**दि १४ जून २०२०**

या दिवशी पालक संघाच्या कार्यकारिणीकडून २०२० साठी नवीन अध्यक्षांची घोषणा करण्यात आली . यामध्ये सर्वानुमते श्री. मिलिंद धारवाडकर यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

**दि २१ जून योगदिन**



शरीर माध्यम खलू द्यर्म साधनम याच उक्तीला अनुसरून योगदिनाच्या निमित्ताने पालक महासंघातर्फे श्री देवळेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पालक आणि शिक्षकांसाठी योगासनांचे सत्र (ऑनलाइन) आयोजित केले होते. यामध्ये विद्यालयाच्याच पालक आणि योगशास्त्राच्या अभ्यासक सौ योगिनीताई देशमुख आणि सौ रुपालीताई तरवडे यांनी योगासनांची माहिती सांगून त्याची प्रात्यक्षिकेही दाखवली . साधारण १०७ पालकांची यासाठी आपल्या कुटुंबासहित ऑनलाईन उपस्थिती होती. श्री मिलिंद , सौ चारुता आणि श्री प्रसाद यांनी उत्तमरीत्या नियोजन करून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.




**दि २८ जून - पालक महासंघ हस्तांतरण सोहळा**


एरवी फार थाटामाटात होणारा हा सोहळा यंदाही zoomमय वातावरणात मा. शरदराव इनामदार व मा. गजाननराव चिंचवडे या मान्यवर द्वयींच्या प्रत्यक्ष उपस्थितीत उत्तरोत्तर रंगत गेला. मातृमंदिरात संपन्न झालेल्या या सोहळ्याला प्रत्यक्ष ३५ तर झूम मिटींगद्वारे २१२ अशी विक्रमी उपस्थिती होती.



उत्तम कार्यभार हाताळलेल्या माजी अध्यक्ष सौ राजश्री ओझर्डे ताईंनी कार्यभाराची धुरा नवनिर्वाचित अध्यक्ष श्री मिलिंद धारवाडकर यांना सूपूर्त केली. आजी सदस्य हे माजी सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली नव्या डिजीटल पध्दतीने समाज घडणीचा हा वसा चालवतील असे ठरले. याच कार्यक्रमात लॉकडाऊन-१ मधील महिन्यात ऑनलाइन जापनीज प्रशिक्षण वर्ग घेतलेल्या शाळेच्या पालक सौ सीमाताई संचेती यांचा सत्कार करण्यात आला. प्रशिक्षणार्थी २५ महिलांना E -Certificate प्रदान करण्यात आले. तसेचं आपले मा. देवळेकर सर यांची निगडी केंद्रप्रमुखपदी नियुक्ती व आदित्यदादा, शिवराजदादा आणि मधुराताई केंद्रीय विभागवार प्रमूख पदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन व आनंद व्यक्त केला गेला. याच दिवशी २०२० साठी पालक संघाच्या नवीन कार्यकारिणी समितीची घोषणा आणि हस्तांतरण करण्यात आले. यामध्ये सर्वानुमते विविध पदांसाठी नावे निश्चित करण्यात आली . अशाप्रकारे पदनिश्चिती झाली. याच कार्यक्रमात पालक महासंघाचे २०-२१ साठीचे कार्यसंकल्प नवीन अध्यक्षांनी सांगितले आणि मातृभूमी पूजनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.




**दि ५ जुलै गुरुपौर्णिमा - मदतीचा हात तुमच्यासाठी खास**




या पालक महासंघाच्या उद्योग विभागाच्या उपक्रमाची सुरुवात झाली. एकूण ३२ फॉर्म पहिल्याच आवाहनामध्ये भरून आले त्यातील १२ मुलाखती पूर्ण झाल्या. मुलाखती द्वारे आपल्यातीलच उद्योजक मान्यवर पालक गटाने गरजू पालकांना मार्गदर्शन केले. आणखी काही पालकांना मदतीचा प्रयत्न चर्चेतून सुरू आहे.

**दि १२ जुलै व्याख्यान - प्रबोधिनीत मला भेटलेले गुरू - मा. देवळेकर सर (केंद्र प्रमुख, ज्ञान प्रबोधिनी निगडी)**



निगडी केंद्राचे प्रमुख विद्यमान माननीय मनोजराव देवळेकर सरांनी त्यांच्या प्रबोधिनीत भेटलेल्या गुरूंचे सार्थ दर्शन प्रेक्षकांना करून दिले. ज्यांनी काही शिकविले, ज्यांनी घडविले ते सारेच गुरुइतक्या नम्रतेने सुरूवात करून सरांनी मा. आप्पा, मा. भाऊ, मा. डॉ . नलूताई, मा. डॉ अजितसर, मा.मोहनराव, मा. कै. भाऊ फडके या सर्वांच्या विद्यार्थी सर्वार्थानं घडविण्याच्या आठवणी सांगून सर्वांनाच(२२५ ऑनलाईन उपस्थित कुटुंबांना) फार फार समृध्द करणारे अनुभव दिले.

**दि. १७ जुलै २०२० रोजी सखी गटाची बैठक . कथ्थक  नृत्यांगना पायल ताई गोखले** यांच्या बरोबर संपन्न झाली. प्रचंड संख्येने उपस्थिती होती. स्त्री आणि कला या विषयी त्यांनी खूप मोलाचे मार्गदर्शन  केले. प्रत्येक स्त्रीने तिच्यातली कला मग ती अगदी छोटी का होईना म्हणजे अगदी दारा तली रांगोळी काढणे जरी असेल ती वर्षानुवर्षे जपली पाहिजे. .अशा छोट्या छोट्या अनेक कला आहेत.  असे जर केले तर दिवसभरासाठी खूप छान उत्साह टिकून राहतो.



**दि १८ जुलै - संघटन गट चर्चा**

कार्यकारिणीच्या १८ जणांच्या उपस्थितीत समाज घडणासाठी उपासना हा लेख वाचून चर्चेला सुरुवात झाली. मा. देवळेकर सरांनी उपासनेसंबंधीचे आपले विचार मांडले. आपल्या अंतर्यामीच्या शक्ती जागवणे म्हणजे उपासना. व्यक्तीचे स्वरूप म्हणजे आतला मी असतो. आपल्या आतून नियंत्रण करणारा म्हणजेच परमेश्वर तोचं अंतर्यामी.going to the world through inside. आप्पांचे याविषयीचे पुस्तकाचा उल्लेख झाला उपासनेद्वारे व्याधीमुक्ती. उपासनेचे महत्व खूप आहे. सातत्य हवे.

**दि १९ जुलै २०२० - वर्गमित्र संकल्पना**

विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील दुवा व वर्गाचा मित्र असा व्यापक उद्देश घेऊन जय्यत तयारीने पालक महासंघ व शाळेतील संवेद विभाग संयुक्त विद्यमाने सक्रीय कार्यरत झाला. प्राथमिक, पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक असे ३ विभागात वर्गमित्र सुरु झाले.  वर्गमित्र उपक्रम संकल्पना : वर्गातील मुलांशी मनमोकळा संवाद साधून त्यांना बोलत करणे व त्यानुषंगाने मुलांचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी ठेवणे व प्रकाशात न येणाऱ्या मुलांपर्यंत पोहचणे. मुलांशी संवाद साधतांना त्यांच्या वयाला अनुरूप विषय घेणे. या शैक्षणिक वर्षातील आव्हाने :

**वर्गमित्र उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२० - २१**

पालक महासंघ + संवेद विभाग यांचा संयुक्त उपक्रम

सहभाग :
- पालक महासंघ शैक्षणिक विभाग प्रतिनिधी
- संवेद विभाग प्रतिनिधी
- इच्छुक पालक

वर्गाशी दूरस्थ संपर्क, त्यामुळे व्यक्तिशः मुलांवर प्रत्यक्ष ताबा नाही

एका तासात काही निवडक मुलांशीच संवाद होण्याची शक्यता

दूरस्थ असल्याने निरीक्षणात अडचणी ची शक्यता

नेटवर्क अडचणी - तासिका उपलब्ध होण्यात अडचण

**दि १९ जुलै २०२० वक्ते.. श्री आदित्यदादा  शिंदे - विषय.. चिपळूण येथील कामाचे निवेदन**

यादिवशी  श्री आदित्यदादा शिंदे  यांनी या सत्रात संघटन आणि त्याचा प्रसार आणि प्रचार या विषयावर खूप छान मार्गदर्शन केले.  संघटनेसाठी काम करताना डोक्यावर बर्फ , हृदयात अंगार आणि जिभेवर साखर ठेवूनच कायम काम करावे लागते ...तसेच आपल्या आवडीपेक्षा गरजेला प्रथम प्राधान्य देणे... इ स्वरूपाचे मार्गदर्शन त्यांनी केले.

**दि २५ जुलै - ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया माध्यमिक मराठी आणि इंग्रजी विभागाच्या** मदतीने १० वी तील सर्व पालकांबरोबर ११ वीच्या ऑनलाईन प्रवेशा संदर्भातील बैठक पार पडली. या मध्ये पालक महासंघाचे उपाध्यक्ष निलेश गावडे यांनी माध्यमिक विभागास सहकार्य केले.

**दि २६ जुलै - व्याख्यान १५ - डॉ. धनंजय केळकर - गप्पा कोरोनावर**

डॉ केळकर सरांनी आपल्या प्रश्नांवर मारलेल्या गप्पा खुपच सहज , सोप्या भाषेत सर्वांपर्यंत पोहोचल्या. कोरोना या विषाणूला घाबरून न जाता त्याबद्दल योग्य ती काळजी घेणे महत्त्वाचे आहे. हा तापाचाच एक प्रकार आहे. त्या पासून




वाचण्यासाठी आपली प्रतिकारशक्ती वाढावी यावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. सूर्यप्रकाश, नियमित व्यायाम आणि संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर पुढील काही महिने, गर्दी टाळावी, मास्क चा वापर वाढवावा आणि एकमेकांत सुरक्षित अंतर ठेवावे. कंपनीमध्ये काम करताना, जेवताना निदान ३-४ फुटाचे अंतर ठेवून बसावे, वातानुकूलित ऑफिसमध्ये थोड्या खिडक्या उघडून खेळती हवा ठेवल्यास अधिक उत्तम. घरून ऑनलाइन काम करण्यास अजून काही महिने प्राधान्य द्यावे. समाजात जाऊन या गोष्टींचे प्रबोधन करावे. कोणतीही भीती न बाळगता पण योग्य खबरदारी घेऊन आपण या वादळाला थोपवू शकतो. सामाजिक जीवनात वावरताना आपणच आपल्याला काही नियम घालून देणे, जागरूकतेने वागणे. याचबरोबर समाजातील सर्व घटकांना सन्मान्य उंचीवर ठेवून वागवीणे ...इ. गोष्टींचा त्यांच्या व्याख्यानात प्रामुख्याने अंतर्भाव होता. डॉ केळकर सर, डॉ बागेश्री, डॉ पराग पाटील, मा देवळेकर सर, आदित्य दादा यांचे पुन्हा आभार. ७०० हुन अधिक कुटुंबातील सदस्यांनी याचा लाभ घेतला त्यांचेही आभार.

**दि ३० जुलै गुरुवार - "Thursday Thoughts"**

पालकांमधील सकारात्मक विचार वाढीसाठी एक छोटासा पण महत्वाचा उपक्रम पालक महासंघ उपसचिव सौ प्रिया माजगावकर यांनी सुरू केला. या मध्ये त्या दर गुरुवारी थोर विचारवंतांचे एक इंग्रजी आणि एक मराठी असे विचार "Thursday Thoughts" या नावाने पालक महासंघाच्या व्हाट्स अँप वर प्रसारित करतात.

**दि २१ जुलै २०२० - श्रावणधारा नियोजन**

गेले तीन वर्षे श्रावण महिन्याचे औचित्य साधून अतिशय यशस्वीपणे पालक संघातर्फे पालक आणि शिक्षकांसाठी




पावसावर आधारित कविता आणि गीतांचा कार्यक्रम श्रावणधारा केला जात आहे. याला प्रतिसाद ही उत्तम मिळतोय. यादिवशी याच श्रावणधारा या कार्यक्रमाच्या नियोजन करण्याचा, त्याच्या प्रसिद्धीचा व नियोजनाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवली गेली आणि तयारीचा आढावा ही घेतला गेला. कार्यक्रम ७ ऑगस्ट रोजी घ्यावा हे निश्चित झाले. पालक महासंघ आयोजित श्रावण धारा हा विद्यालयातील पालक आणि अध्यापकांसाठी पावसावर आधारित कविता आणि गाण्यांचा कार्यक्रम

या दिवशी संपन्न झाला . जवळपास ६० जण या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यापैकी ३६ जणांनी काव्य वाचन केले. कार्यक्रमाला खूप छान प्रतिसाद मिळाला. मराठी कवितांबरोबरच हिंदी आणि संस्कृत काव्याचेही यात सादरीकरण झाले.  सौ माधवी , सौ प्रिया , सौ प्राची , सौ चारुता यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला .


**दि ८ ऑगस्ट**



पालक महासंघाच्या क्रीडा विभागाच्या वतीने अनोख्या दूरस्थ क्रीडा स्पर्धेची आखणी केली गेली .  यामध्ये **एक मिनिटाचा खेळ** या संकल्पने अंतर्गत **दोरीच्या उड्या , सूर्य नमस्कार , बॅटवर बॉल झेलणे या स्पर्धांचे** नियोजन केले. पालकांनी यापैकी कोणत्याही एका खेळाचा व्हिडीओ करून तो स्पर्धेसाठी  पाठवावा असे ठरले. या उपक्रमात  श्री अरुण मरळ , सौ हर्षदा माळी , श्री आनंद देशमुख यांनी काम पाहिले. ह्या स्पर्धेसाठी जास्तीजास्त पालक आणि शिक्षकांनी भाग घेऊन त्याचे व्हिडीओ २३ ऑगस्ट पर्यंत पाठवावेत असे जाहीर आवाहन केले गेले. जवळपास ६० स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला. यामध्ये प्रत्येक खेळात ३ आई पालक आणि ३ बाबा पालकांनी विजयी घोषित करून त्यांना ३० ऑगस्ट रोजी e-certificate देण्यात आले

**दि ९ ऑगस्ट व्याख्यान  १६ - मी , माझे कुटुंब आणि कायदा - सौ. प्रतिभाताई जोशी दलाल**


पालक महासंघ आयोजित व्याख्यानमालेत  पालक महासंघाच्या सक्रिय सदस्या आणि  Advocate सौ प्रतिभाताई




जोशी-दलाल  यांचे मी , माझे कुटुंब आणि कायदा या विषयावर  माहितीपर व्याख्यान आयोजित केले गेले.  यामध्ये  महिलांचे  अधिकार , दत्तक विधान , वारसा हक्क , Right to education , Social Laws  अशा वेगवेगळ्या विषयांवर ताईंनी अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. या सत्रासाठी १३५ पालकांची सहकुटुंब ऑनलाइन उपस्थिती होती. हे कायदे माहितीपर व्याख्यान अतिशय उपयुक्त ठरले. या कार्यक्रमात सौ राजश्री ओझर्डे यांनी सूत्रसंचालन केले , सौ माधवी पोतदार यांनी प्रास्तविक आणि परिचय करून दिला तर श्री मिलिंद धारवाडकर यांनी आभार प्रदर्शन केले आणि सौ हर्षदा माळी यांनी प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप केला .

**दि १५ ऑगस्ट – निगडी केंद्र वेब साईटचे अनावरण**

या दिवशी विद्यालयात ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. निगडी केंद्राची ओळख अशी एक वेब साईट असावी असे



नियोजन महिनाभर आधीपासून होत होते, त्यामध्ये पालक महासंघाच्या टेक्निकल टीमने विशेष योगदान करून १५ ऑगस्ट ला नवीन वेब साईट चे अनावरण करूयात असे निश्चित केले. त्यानुसार सकाळी ९ वाजता  निगडी केंद्राच्या वेब साईटचे अनावरण श्री देवळेकर सर आणि श्री मिलिंद धारवाडकर यांच्या हस्ते झाले. या निमित्ताने प्रथमच पालक महासंघास १५ ऑगस्ट च्या केंद्रातील कार्यक्रमात सहभागी

होता आले. वेब साईट निर्मिती मध्ये श्री कुमार भवार यांनी सिंहाचा वाटा उचलला, त्यांना इतर पालकांनी, अध्यापकांनी मोलाची साथ दिली.

**दि. २० ऑगस्ट ज्ञान प्रबोधिनी - कार्यदिशा परिचय - श्री आदित्य दादा शिंदे**



कै . आप्पा पेंडसे स्मरणदिना निमित्त श्री आदित्य दादा शिंदे , गुरुकुल विभाग प्रमुख यांचे ज्ञानप्रबोधिनी ची कार्य दिशा परिचय या विषयावर व्याख्यान झाले. देशप्रश्न सोडवणे , चारित्र्यसंपन्न व्यक्तीमत्व घडवणे , प्रभावी नेतृत्व घडवणे हे विशेष उदिदष्टे समोर ठेवून कै आप्पांनी ज्ञानप्रबोधिनीची स्थापना केली, असे त्यांनी अनुभव कथन केले. म्हणूनच ज्ञान प्रबोधिनी ही नुसते पुस्तकी ज्ञान देणारी शाळा नाहीं. त्यामुळे जरी या शाळेत भौतिक वेगळेपण नसले तरी उद्दीष्टां मध्ये वेगळेपण आहे. असेही ते म्हणाले. त्यांच्या बरोबर प्रबोधिनीच्या विविध शाखांमध्ये कोणते उपक्रम चालतात कशा प्रकारे कार्यदिशा राबविल्या जातात त्यासाठी कोणत्या विविध समिती आहेत या विषयी सविस्तर व प्रेरणादायी कथन आदित्य दादांनी सोप्या शब्दात केले. हे व्याख्यान नियोजनाचे कार्य राजश्री ताईंनी केले.

**गणेशोत्सव नियोजन आणि उपक्रम**

लो. टिळक स्मृती शताब्दी वर्ष आणि गणेशोत्सव , संघटन विभागाने नियोजन करावे असे ठरवण्यात आले त्याप्रमाणे पालक महासंघाचे २ प्रतिनिधी श्री निलेश गावडे (गणेशोत्सव सहायक प्रमुख) आणि सौ प्रतिभा ताई यांची निवड झाली.



त्यांना लो. टिळक पुस्तक प्रदर्शन सजावटीमध्ये आणि विविध स्पर्धांमध्ये सौ प्राची क्षीरसागर यांनी छान साथ दिली. या गणेशोत्सवात प्रामुख्याने तीन महत्त्वाचे उपक्रम घेण्याचे ठरले.

१ दूरस्थ राहून संघटित अथर्वशीर्ष पठण - सहभाग १२७ कुटुंब

२ गणपती साठी पारंपारिक प्रसाद बनविण्याची माहिती संकलित करणे - सहभाग ३५ महिला पालक

३ पालक व शिक्षकांसाठी प्रश्न मंजुषा - २८८ कुटुंब सहभाग फेरी १ साठी

गणेशाची प्राणप्रतिष्ठापणा, पूजा आणि आरतीला श्री धारवाडकर आणि श्री गुरव सपत्नीक पूजक म्हणून लाभले. गणेशोत्सवाची सुरुवात अतिशय मंगलदायी पूजेने आणि उत्साहाने झाली. सर्वांवरील संकट मंगलमूर्ती तारून नेईल अशी प्रार्थना सर्वांनी केली. दररोजचे प्रक्षेपण You Tube वरून होत होते त्यामुळे सर्व कार्यक्रम आणि आरतीचा अनुभव घरबसल्या मिळाला.

**दि २२ ऑगस्ट**

गणेशोत्सवाचाच एक उपक्रम म्हणून पालक महासंघातर्फे पालकांसाठी पारंपारिक प्रसाद या स्पर्धेचे आयोजन केले गेले.

त्यासाठी  सर्व वर्गावर या स्पर्धेचे गूगल फॉर्म्स पाठवले गेले. सौ प्राची , सौ माधवी, श्री प्रसाद,  सौ प्रिती यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. यात जवळपास ३५ महिला पालकांनी  उस्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

**दि २३ ऑगस्ट अथर्वशीर्ष पठण**




दि २३ ऑगस्ट , रविवार, यादिवशी पालक महासंघातर्फे  पालक आणि अध्यापकांसाठी सौ प्रतिभा दलाल यांनी सामूहिक अथर्वशीर्षाचे आयोजन केले. हे सत्र ऑनलाइन होते, यासाठी जवळपास १२७ जणांनी सहकुटुंब सहभाग नोंदवला. याची तीन आवर्तने करण्यात आली. कार्यक्रम खूप छान झाला.

**दि २३ ऑगस्ट प्रश्नमंजुषा**

पालक महासंघातर्फे सर्व पालक आणि अध्यापक यांच्यासाठी सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन केले गेले.






याला खूप उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. २८८ जणांनी यात सहभाग नोंदवला. याच्या एकूण तीन फेऱ्या झाल्या. यातील दुसरी आणि तिसरी फेरी झूम वर घेतली गेली. यातून सात विजेते  घोषित केले गेले. यासाठी सौ प्राची, सौ प्रिती, सौ कविता, सौ चारुता आणि श्री मिलिंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

**दि २५ ऑगस्ट - पालक महासंघाच्या वतीने श्रींची आरती**



या दिवशी पालक महासंघाच्या वतीने आरतीचा कार्यक्रम झाला. निवडक सदस्य यासाठी प्रत्यक्षात मातृ मंदिरात उपस्थित होते. तर बाकीच्या सर्व सदस्यांनी online हजेरी लावली.  श्री राहुल दिकोंडा आणि श्री राहुल वाणी हे यासाठी सपत्नीक पूजक म्हणून उपस्थित होते. दोन्ही उभयतांच्या हस्ते आरती करण्यात आली.  याप्रसंगी कार्यालयाचे प्रमुख  श्री. तासगावकर सर ही उपस्थित होते. सौ प्रतिभा यांनी पूजकांची ओळख करून दिली आणि पूजकांच्या मार्गदर्शनानंतर पालक महासंघाचे अध्यक्ष श्री धारवाडकर यांनी आभार प्रदर्शन केले.

**सप्टेंबर २०२० - गीता रहस्य वाचन उपक्रम**



७ तारखेला गीतारहस्य वाचन उपक्रमासंदर्भात वाचन व वाचक आवाहन केले गेले. उत्तम प्रतिसाद मिळालेल्या या गीतारहस्य वाचन उपक्रमांतर्गत १२ सप्टेंबरला ३४ उत्साही वाचक सहभागी झाले. प्रत्येक शनिवारी व रविवारी पहाटे ६.१५ वाजता आधी उपासना आणि नंतर तासभर वाचन असा हा गीता रहस्य वाचन उपक्रम नियमितपणे सुरू झाला आहे. लो. टिळकांच्या स्मृती शताब्दी निमित्ताने सुरू झालेला हा उपक्रम अत्यंत नियोजन पद्धतीने सुरू आहे आणि त्यावरील परिच्छेदांनवर चर्चा

ही होत आहे. श्री यशवंतराव लिमये, श्री देवळेकर सर, श्री नचिकेत देव , श्री प्रवीण दादा यांच्या उदाहरणासहित मार्गदर्शनामुळे काही कठीण उतारे समजून घेणे सोपे जात आहे.

**१३ सप्टेंबर - पालक महासंघ - व्याख्यानमाला, पुष्प १७ - विषय आर्थिक नियोजन आणि गुंतवणूक पर्याय**

ह्यामध्ये श्री.सुशील मोरे, श्री.राहुल दिकोंडा आणि श्री.महेश राजपूत यांनी म्युच्युअल फंड,आरोग्य विमा, आयुर्विमा, शेअर




बाजारातील गुंतवणूक,पारंपरिक आणि नवे गुंतवणूक पर्याय याबद्दल मार्गदर्शन केले. श्री.आनंद बिराजदार आणि श्री.मिलिंद धारवाडकर यांनी प्रेक्षकांच्या मनातले प्रश्न विचारून तिघांनाही बोलते केले. अतिशय अनौपचारिक स्वरूपातील ह्या गप्पा १०० हुन प्रेक्षकांना भावल्या. आपण सगळे कमावत असतोच परंतु प्रत्येकजण तितक्याच डोळसपणे पैशांचा विनियोग , नियोजन करतोच असे नाही. शिवाय बाजारात एवढे विविध पर्याय उपलब्ध असताना कोणाचाही गोंधळ उडणेही तितकेच स्वाभाविक आहे. तो गोंधळ काही प्रमाणात दूर करून विविध पर्यायांची तोंडओळख करून देण्याचे काम तीनही वक्त्यांनी केले. अवघड विषय सोप्या आणि ओघवत्या भाषेत समजावून सांगितल्याने प्रेक्षक खुश झाले तसेच प्रेक्षकांनी एक एका विषयाला धरून सविस्तर व्याख्यान आयोजित करण्याची मागणी देखील केली.

**१५ सप्टेंबर - रिक्षा, टेम्पो काकांसाठी मदतीचे आवाहन**

" नमस्कार, कोरोना अवघड आणि संकटाचा काळ. आपण पाहत आहोत की अनेकांच्या नोकरीवर आणि व्यवसायावर



परिणाम होत आहेत. त्यातील प्रामुख्याने फटका बसला आहे तो ट्रान्सपोर्ट व्यवसाय. माणसाची जणू काही गतीच थांबली आहे आणि सर्वकाही घरूनच व्हावे अशी परिस्थिती आहे. ते बरोबर देखील आहे. शाळा सुद्धा घरूनच... आता ४ महिने होत आले. आपल्या विद्यार्थ्यांना ने-आण करणारे रिक्षा, टेम्पो , व्हॅन अगदी एका जागी उभ्या आहेत. कोरोनाची झळ त्यांनाही खूप बसत आहे. त्यांचेही कर्जाचे हप्ते आहेत. रिक्षावाले काका, टेम्पोवाले काका त्यांचे ही घर चालले पाहिजे, त्यांनाही मदत व्हायला हवी. सधन पालकांनी आपल्या रिक्षा , टेम्पो वाल्या काकांना स्वेच्छेने मदत करावी अशी मी विनंती करतो. ज्या पालकांनी गेल्या वर्षी रिक्षा, टेम्पो, व्हॅन लावले होते त्यांनी आपल्या काकांची विचारपूस करावी मदतीचा हात पुढे करावा अशी मी विनंती करतो. ज्यांना मदत करण्याची इच्छा आहे त्यांनी आपले पालक श्री निघोट ह्यांच्याशी अधिक माहिती साठी संपर्क करावा. "

अशा प्रकारचे आवाहन पालक महासंघ सदस्यांना करण्यात आले.

**१७ सप्टेंबर - कोरोना मदतकेंद्र (Corona helpline)**

सध्याची परिस्थिती बघता कोरोना पेशंट ची संख्या झपाट्याने वाढत आहे. हॉस्पिटल मधील बेड ची कमतरता, ऑक्सिजन ची कमतरता, कोव्हीड टेस्ट कुठे करावी, घरच्या घरी त्वरित कोणते उपचार करावे, परिस्थिती बिकट झाल्यास कोणाचे मार्गदर्शन  घ्यावे असे अनेक प्रश्न लगेच आपल्यासमोर येतात, त्यावर उपाय म्हणून आपल्यातीलच काही अनुभवी डॉक्टर पालक एकत्र येत आले. आपले कार्यकारीणी सभासद आणि पालक डॉक्टर श्री योगेश्वर सानप हे या उपक्रमाचे नेतृत्व करत आहेत.




ह्या मदत केंद्राची रूपरेषा खालील प्रमाणे आहे:

१. ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातील पालक, शिक्षक, सेवक, आणि इतर संघटन विभाग याचा लाभ घेऊ शकतील.

२. मुख्यत्त्वेकरून कोव्हीड संदर्भातीलच अत्यंत तातडीचे मार्गदर्शन ह्या संपर्क केंद्रातून दिले जाईल

३. ह्या संपर्क केंद्रातील डॉक्टर स्वतः कोरोना योद्धे आहेत आणि कोरोना मधील उपाय योजनांचा त्यांना भरपूर अनुभव आहे.

खाली नमूद केलेले आपले पालक डॉक्टर या २४ तास चालणाऱ्या उपक्रमात सहभागी आहेत त्यांचे धन्यवाद.

1. Dr Yogeshwar Snap
2. Dr Parag Patil
3. Dr Shankar Mosalgi
4. Dr Dipti Dharmadhikari
5. Dr Medha Deolekar
6. Dr Nilesh Shirke

**दि १८ सप्टेंबर - सखी गट (मासिक बैठक ) वक्त्या - सौ अनघाताई देशपांडे  - विषय:  ज्ञान प्रबोधिनी युवती विभाग**



या बैठकीस साधारण ४०+ इतकी उपस्थिती होती. अतिशय अनौपचारिक असे अनुभव कथन अनघा ताईंनी केले .  इयत्ता आठवी पासून राखी विक्रीच्या उपक्रमातून इथे विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व प्रशिक्षणाची खऱ्या अर्थाने सुरुवात होते असे अनघा ताईंनी सांगितले. युवती विभागाचा संकल्प लिहिणे, स्वदेशी अभियान , परिसंवाद आयोजन ( युवतींचा आत्मिक  विकास कसा व्हावा )  शारदोत्सवाचे आयोजन  तसेच आजूबाजूचा परिसर पिंजून काढून सर्वांना सहभागासाठी आग्रहाने आमंत्रित करणे. यातूनच युवती संघटन  करणे इ. कार्याला सुरुवात

केली असे त्यांनी सांगितले . कार्यक्रम अतिशय नेटका आणि माहितीपूर्ण झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मंजिरी छापेकर पद्य सादर केले. माधवी पोतदार यांनी प्रस्तावना आणि परिचय करून दिला. हर्षदा माळी यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.


**२७ सप्टेंबर - व्याख्यानमाला, पुष्प - १८ वक्ते- मा.विनोद बोधनकर, विषय - प्लास्टिक, पर्यावरण व कोरोना**




साधारण १७३ कुटुंबे या व्याख्यानासाठी उपस्थित होती. दरवर्षी २०० देशांतून मिळून साधारण ८० लाख टन प्लास्टिक समुद्रात जाते ही फारच गंभीर बाब आहे. यामुळे जमिनीवरील आणि पाण्यातील अनेक पशु पक्षी मरत आहेत त्यांची अन्नसाखळी आणि जीवसृष्टी संपत येत आहे. आपल्या घरातील राजकुमार आणि राजकुमारिनी जसे आपण वर्तमानपत्र बाजूला ठेवतो तसे प्लास्टिक बाजूला ठेवायला हवे, प्लास्टिक संकलन हा उपक्रम शालेय शिक्षणात ही समाविष्ट व्हावा अशी आशा श्री बोधनकारांनी व्यक्त केली. पालकांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे देत आणि कोरोनाच्या काळात कोणती काळजी घ्यावी असे सांगत सर्वांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना सौ तृप्ती दिकोंडा, पद्य सौ प्राची क्षीरसागर, परिचय सौ प्रतिभा ताई आणि समारोप सौ प्रिया माजगावकर यांनी प्रार्थनेने केला. या निमित्ताने हा विषय अनेक कुटुंबात पोहोचला आणि इनर व्हील क्लब ऑफ निगडी बरोबर असणारे पालक महासंघाचे नाते आणखी दृढ झाले.

**३० सप्टेंबर - गुगल कलासरूम अध्यापक आणि पालक प्रशिक्षण**

JOSH (Jnana Prabodhini Online Schooling Hub) दूरस्थ शिक्षणाचे नवीन आव्हान स्विकारत Google Classroom, Google meet हे अँप्लीकेशन आत्मसात करून घेण्यासाठी Google Classroom चे ट्रेनर टीम तयार केली गेली व प्रशिक्षणाचे नियोजन केले गेले. हे सर्व नियोजन आपल्यातीलच तंत्रज्ञान अवगत असणारे पालक हे नवीन तंत्रज्ञान आपल्या अध्यपकाना आणि पालकांना सांगणार आहेत. या उपक्रमामध्ये श्री अमोल देशपांडे, श्री कुमार भवार, श्री आनंद बिराजदार, श्री प्रशांत खैरनार, श्री पंकज चापोलीकार असे आणि इतर १० -१५ सदस्य मदत करत आहेत. त्याचबरोबर सौ आरती ताई आणि सौ साक्षी ताई यांची केंद्रीय विभागाशी नियमितपणे या विषयावर चर्चा होत आहे.








नियमित उपक्रमांमध्ये वर्गमित्र हा उपक्रम खूप छान पद्धतीने चालू आहे त्यातील प्रत्येक विभागातील एका वर्गाच्या २ तासिका झाल्या आहेत आणि संवेद विभागाच्या मार्गदर्शनानुसार त्याची टिपणे ही काढणे चालू आहे.

आमचे कार्यकारीणी सदस्य सांस्कृतिक उपक्रमात ही मागे नाहीत. सौ माधवी पोतदार आणि श्री मिलिंद धारवाडकर यांनी आपल्या **मुक्तीसोपान विभागाच्या प्रकाशगाणी** या उपक्रमात सहभागी नोंदविला आहे. तसेच प्रबोधिनी पद्य शिकावे अशी बऱ्याच सभासदांची इच्छा आहे त्यासाठीचा एक प्रशिक्षण वर्ग सुरू झाला आहे.

उपक्रमांव्यतिरिक पालक महासंघ कार्यकारीणी चा गट **नियमितपणे उपासना आणि इतर पाक्षिक बैठकांसाठी** ऑनलाईन भेटत असतो. त्यातून एकमेकांचे विचार कळतात आणि पुढील नियोजन करणे सोपे होते.

**४ ऑक्टोबर २०२० रविवार  व्याख्यानाचा विषय... व्यक्तिमत्त्व विकसनाचे पैलू  वक्ते..... श्री.आदित्यदादा शिंदे**



आजच्या व्याख्यानात  व्यक्तिमत्त्व म्हणजे काय ....त्याचे विकसन कसे करावे... त्यासाठी कोणकोणत्या गोष्टीवर आपण भर दिला पाहिजे... या अशा अनेक गोष्टींवर आदित्यदादांनी नेहमीप्रमाणेच अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्त्व विकासनासाठी प्रत्येकाने आवर्जून आचरणात आणावेत असे महत्वाचे मुद्दे...👇👇

* स्वतःचा आत्मसन्मान जपणे.

* स्वावलंबन अंगिकारणे.

* अंगी तत्परता बाळगणे

* गुणवत्तेत तडजोड न करणे

* कामात उत्तमता हवीच

* नाविन्याची कास धरणे . (रोज नवीन काहीतरी सुचलं पाहिजे यासाठी प्रयत्नशील असणे)

* स्वतःत आवश्यक ते बदल घडविणे

*स्वतःच्या हिताबरोबरच दुसऱ्याचेही हित साधणे

* इतरांच्या हितासाठी स्वतःची शक्ती वापरणे

* दैनंदिन नित्योपासना नेमाने करणे




अशा  पद्धतीने स्वतःच स्वतःला घातलेल्या नियमांनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व कसे सुधारता येते... याची उत्तम उदाहरणे आणि  ...स्वतःच्या अनुभवांचे दाखले देत ...उपस्थित श्रोत्यांच्या शंकांना आणि प्रश्नांना उत्तरे देत आदित्यदादांनी उपस्थितांशी अतिशय सुंदर अनौपचारिक संवाद साधला .

**दि ११ ऑक्टोबर , रविवार व्याख्यान :भारत-चीन संघर्ष  वक्ते: माजी विंग कमांडर श्री  किरणजी पळसुले**

पुणे प्रबोधिनीचे विद्यार्थी असलेले  आणि नौदलात विंग कमांडर म्हणून कार्य केलेले श्री पळसुले सरांनी भारत चीन संघर्ष ...याची कारणे आणि इतिहास यावरअतिशय उपयुक्त आणि माहितीपर व्याख्यान दिले.

यामध्ये त्यांनी ...




* भारताचा नेमका शत्रू कोण?
* आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणताही देश कोणाचाही कायमस्वरूपी मित्र किंवा शत्रू नसतो
* जवळपास २२ देशांबरोबर चीनचे सीमावादावर संघर्ष चालू आहे
* आपले नेहमीच इतर देशांनी ऐकावे अशी चीनची मनोवृत्ती
* जॉन्सन लाईन माहिती
* १९५४ सालचा भारत चीन यामधील पंचशील करार
* १९५६ साली चीनने केलेली घुसखोरी
* १९६२ साली झालेल्या युद्धात भारत गाफील राहिल्याने, पूर्ण क्षमतेने प्रतिकार न केल्याने स्वीकारावी लागलेली हार
* १९६७ साली नथुला सीमेवर झालेले युद्ध, त्यातील भारताची सरशी.
* १९४७ साली पाकिस्तानातून भारतात झालेली घुसखोरी ...आणि तेव्हापासून ती आजतागायत चालूच आहे.
* Mao tse tung यांचे तिबेटविषयक धोरण
* आपल्या सशस्त्र सेनेला आपल्या कडूनच नीट हाताळले न जाणे.
* जगभरात भारताचे वाढते सामर्थ्य
* आतापर्यंतच्या इतिहासात भारतीय सेनेने बजावलेले कर्तृत्व
* भारताची दीर्घकालीन उद्दिष्टे


अशा अनेक वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी सविस्तर माहिती दिली ...अनेक विषयांवर सोप्या भाषेत  प्रकाश टाकला . खऱ्या अर्थाने हे खूपच माहितीपूर्ण व्याख्यान ठरले. याला खूपच छान प्रतिसाद मिळाला .

**१५ ऑक्टोबर  मोडी लिपी प्रशिक्षण**



शिवकालीन युगात व त्यापूर्वी व नंतरही मराठीइतकीचं वापरली गेलेली मोडी लिपी. त्याचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण   द्यावे या उदात्त हेतूने प्रबोधिनी पालक महासंघ  व गडकिल्ले सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने व प्रशिक्षक निलेशजी गावडे यांनी यशस्वीपणे पार  पाडले.

दिनांक १५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या काळात घेतलेल्या या मोडी लिपी वर्गाला ७५ इतक्या मोठ्या संख्येत विद्यार्थी लाभले. १० वर्षाच्या विद्यार्थ्यां पासुन ७० वर्षांचे काकाही सदर वर्गात एकाच उत्साहाने शिकले. महाराष्ट्र राज्यातील अनेक गड किल्ल्यांवर दिसणारी व उत्सुकता वाढवणारी अशी ही लिपी शिकविण्याचे शिवधनुष्य निलेश दादा गावडे, कुमार दादा भवार व पालक महासंघाच्या टीमने यशस्वीपणे पेलले. सदर प्रशिक्षणाचा ३१ ऑक्टोबर रोजी माननीय देवळेकर सरांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन या वर्गाचा समारोप झाला .



**१६ ऑक्टोबर सखी गट ..व्याख्यान वक्त्या ... सौ मानसीताई बोडस विषय: वेळेचे नियोजन**

या संवादात मानसीताईंनी वेळेचे गणित जमवण्याचा खूप सोप्या युक्त्या सांगितल्या. * आपल्या प्रत्येकीकडे एका दिवसात १४४० मिनिटे असतात. * त्याचा योग्य पद्धतीने आणि योग्य ठिकाणी वापर करावयास शिकले पाहिजे.

* आपल्या २०%सवयी या आपल्या८०%कामावर परिणाम करत असतात.

* अर्थातच आधीच विचारपूर्वक नियोजन करून प्रत्येकीनेच आपल्या छंदासाठी, किंवा priorities साठी नक्कीच वेळ द्यायला हवा

* वेळप्रसंगी खंबीरपणे नाही म्हणायला (नम्रतेने) शिकले पाहिजे.

* रोज झोपण्यापूर्वी पाच मिनिटे दिवसभराच्या कामांचा आढावा घेणे गरजेचे.

* Urgent, important चा टाकता6 करणे गरजेचे.

* मनाला, शरीराला नियमित व्यायाम आणि उपासनेने, वाचनाने सुदृढ ठेवणे गरजेचे.

* रूप पालटू देशाचे हे केवळ पाल्यांनीच नव्हे तर आपण पालकांनीही त्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे.

साधारण ७५जणींच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली .

**दि २१ ऑक्टोबर बुधवार विषय: चाळिशी नंतरचे महिलांचे आरोग्य**

वक्त्या...

*१ रजोनिवृत्ती ... डॉ सोनल बोन्द्रे*

*२ हाडांच्या समस्या.. डॉ भारती देवकर*

*३ मानसिक आरोग्य.. डॉ बागेश्री देवकर*

ज्ञान प्रबोधिनी पालक संघ, अध्यापक वर्ग आणि माजी विद्यार्थिनी यांच्या संयुक्त विद्यमाने या अतिशय माहितीपर व्याख्यानाचे आयोजन केले गेले. सुमारे १९०हून अधिक महिलांची यादठी ऑनलाइन उपस्थिती होती हे विशेष.

* योग्य आहार, नियमित व्यायाम, आणि नियमित वैद्यकीय तपासणी ही त्रिसूत्री महिलांनी कायम आचरणात आणावी हे तज्ज्ञांनी यातून सांगितले.

* मेनापॉजच्या काळातील लक्षणे, तेव्हाच्या समस्या आणि त्यासाठी स्त्रियांनी कोणती काळजी घ्यावी, याची योग्य आणि सविस्तर माहिती यातून मिळाली.

* I am human to respond not a chemical to react ...या कानमंत्रातून प्रतिक्रिया देण्यापेक्षा प्रतिसाद देणे महत्वाचे... स्वतःला आहे तसे स्वीकारावे, नेहमी आनंदी आणि समाधानी राहावे, सकस आहार घेऊन नियमित व्यायाम करणे

* तसेच वर्षातून किमान एकदा तरी सगळ्या वैद्यकीय चाचण्या करून घेणे.

* स्वतःच स्वतःची डॉक्टर होऊन चुकीचे उपाय न करणे.

* सकारात्मक विचारसरणी ठेवणे

अशा प्रकारचे उत्तम मार्गदर्शन या व्याख्यानातून केले गेले .

कार्यक्रमाची सुरुवात सौ मधुरा ताई लुंकड यांनी पाहुण्यांची ओळख व प्रस्तावना करून केली तर सौ प्राचीताई क्षीरसागर यांनी आभार मानून समारोप केला .

**दि २३ ऑक्टोबर , शुक्रवार *सखी गट आणि पालक महासंघ आयोजित महाभोंडला आणि स्तोत्र पठण**


शारदीय नवरात्राचे औचित्य साधून सर्व महिला पापक आणि महिला अध्यापकांसाठी यादिवशी भोंडला आणि स्तोत्र पठणाचे आयोजन केले गेले. कार्यक्रम अर्थातच ऑनलाइन होता . तरीही ५०+ इतक्या महिलांची यासाठी सहकुटुंब उपस्थिती होती. सर्वच महिलांनी अतिशय उत्साहाने पुढाकार घेऊन याचे नियोजन केले.

माधवीताईं पोतदार यांनी याची प्रस्तावना केली, प्रतिभाताई दलाल व सहकाऱ्यांनी अन्नपूर्णा स्तोत्र व श्रीसुक्ताचे पठण केले ..प्राचीताई क्षीरसागर आणि संपदा ताई पटवर्धन यांनी अनुक्रमे याची माहिती सांगितली.

यानंतर माधवी ताईंनी भोंडल्याची माहिती सांगितली ...सुजाता ताई केळकर , अश्विनी ताई तळेगावकर , संजीवनीताई आर्णीकर , रश्मीताई रजपूत , संपदाताई पटवर्धन या सगळ्या मैत्रिणींनी आपल्या सुरेल आवाजात भोंडल्याची गाणी सादर केली. राजश्रीताई ओझर्डे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रिया ताई माजगावकर यांनी समारोप केला .. चारुताताई देशपांडे यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले . यासाठी अतिशय उत्तम तांत्रिक सहाय्य करण्याचे काम मिलिंददादा धारवाडकर आणि प्रसाद दादा दगडे यांनी केले. सर्वात महत्वाचे म्हणजे या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नवीन महिला पालक सखी गट आणि पालक संघाशी जोडल्या गेल्या हे विशेष उल्लेखनीय होय.

या बरोबरच पालक महासंघाचे वर्गमित्र, गीता रहस्य वाचन, डॉक्टर पालकांचे कोरोना मदतकेंद्र, गुरुवार चे नियमित सुविचार, कार्यकारीणी आणि उद्योग गटाच्या बैठका चालू आहेत. **नवीन FB page** वरचा आधुनिक पालक महासंघ आता २००० हुन अधिक लोकांपर्यंत दूरस्थ पणे पोहोचला आहे. पालक महासंघाच्या व्याख्यानमाला you tube द्वारे प्रदर्शित होत असतात त्यामध्येही परिसरातील बरीच कुटुंबे सहभाग नोंदवतात आणि प्रतिसाद देतात.

**१ नोव्हेंबर २०२० पालक महासंघाच्या व्याख्यान २० वे पुष्प यामध्ये प्रसिद्ध रंगकर्मी श्री योगेशजी सोमण** यांनी उपस्थित



श्रोत्यांशी अनौपचारिक संवाद साधला ... कला क्षेत्रातील आव्हाने आणि संधी हा विषय घेऊन कला क्षेत्र, करिअर म्हणून निवडताना पालक व मुलांसाठी जणू कानमंत्रचं दिला. प्रथमतः स्वयं अध्ययन, छंद जोपासना, निर्णय घेण्याची क्षमता तयार करणे समोर असलेल्या




पर्यायातून योग्य ते निवडण्याची मुभा मुलांना देणे ) , शालेय स्तरावर विविध चर्चा, व्याख्याने ऐकणे पालकांनी सतत शिकविण्याचा अट्टाहास टाळणे(मुक्त श्रोता व्हा व होवूद्या) आवड जोपासा(अशा वेळी 'लोक काय म्हणतील?' असा विचार नको) ग्लॅमरने व यशाने हुरळून जावू नकात तसेच नियमीत श्वसनाचे व्यायाम , ओंकार अशी साधना करा असे नानाविध पैलू योगेशजींनी सांगीतले. कार्यक्रमाला झूमवर ६५+ तर युट्यूब लाईव्ह वरही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**५ नोव्हेंबर २० व्यक्तिमत्त्व विकसनाचे अनेकविध पैलू** हाताळत संघटना बांधणी करणे असा जोरदर विषय घेऊन



**मा. श्री शिवराजदादा पिंपुडे** यांनी पालक संघातील सदस्यांशी संवाद साधला. समविचारी लोकांनी स्थापलेले संघटन हे तशीचं ठोस तत्वे व विचारांसह , नवीन सदस्यांना क्रमबध्द प्रशिक्षण देत, सर्वांच्या मतांचा साधक बाधक विचार होवून अंमलबजावणी करणारे असे असावे. तसेचं गट बांधून राहावा (मतमतांतरासह), उदिष्टांवर निष्ठा असावी , सारे सदस्य समान व उद्योगशील राहतील, योग्य बदलांना सामोरे जातील, आज्ञाधारक राहतील असा गटातील सर्वांचाच प्रयत्न असावा..... असे सोप्या शब्दात उत्तम असे मार्गदर्शन शिवराजदादांनी केले.

**१० नोव्हेंबर , रविवार विषय.. पाककृती मार्गदर्शन वक्त्या... सौ शोभा श्रीकांत**




एखाद्याच्या मनात शिरण्याचा मार्ग त्याच्या पोटातून जातो असं कधीकधी गंमतीने म्हंटल जातं. पेटपूजा हा सर्वांचा जिव्हाळ्याचा विषय ! यालाच अनुसरून पालक संघाने दिवाळीच्या निमित्ताने पाककृती मार्गदर्शन वर्ग आयोजित केला होता. सौ शोभा श्रीकांत यांनी या निमिताने अतिशय creative आणि उत्तम रेसिपीजचे प्रात्यक्षिक दाखवले. यात प्रामुख्याने म्हैसूरपाक , तिरुपती बालाजी लाडू ,टोमॅटो बर्फी आणि बुंदीचे अनेक प्रकार त्यांनी यामध्ये करून दाखवले. यानिमित्ताने उपस्थित पालकांना खूप छान छान पाककृती शिकायला मिळाल्या .

**२२ नोव्हेंबर , रविवार , २०२० प्रतिज्ञाग्रहण ..निगडी केंद्र मार्गदर्शक ..आ.श्री गिरीशराव बापट**



सौर अग्रहायण १ १९४२ म्हणजेच २२नोव्हेंबर रोजी निगडी केंद्राचा प्रतिज्ञा ग्रहणाचा कार्यक्रम झाला. निगडी केंद्रातील अठरा सदस्यांनी प्रथम प्रतिज्ञा , पाच जणांनी द्वितीय प्रतिज्ञा , आणि दोन सदस्यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली .

यात्रसंगी पालक संघातील प्राची क्षीरसागर , माधवी पोतदार, पंकज दादा चापोलीकर , हर्षदा माळी यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली .. यात्रसंगी श्री गिरीशराव बापट यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले .

**२९ नोव्हेंबर २० मानवी जीवनातील भाषेचे महत्व** असा छान विषय घेऊन पालक महासंघ व्याख्यानमालेचे २१ वे पुष्प



फुलले. **सौ. शर्वरीताई ताथवडेकर** यांनी ओघवत्या भाषाशैलीत ध्वनीपासून ...शब्द निर्मिती आणि त्यापासून वाक्य असा भाषेचा प्रवास उलगडला. मानवी भावभावनांच्या व्यक्त होण्यासाठी भाषेची गरज त्यान्वये समाज व पर्यायाने संस्कृती एकत्रीकरण व एक प्रकारे समाज व देशाला बांधून ठेवण्याची ताकद भाषेमध्ये आहे. तसेचं शर्वरीताई भाषा का शिकायची ...यावरही बोलल्या भाषेला पाठ्यपुस्तकाबाहेर न्यायला हवं मातृभाषेप्रमाणेचं श्रवण....भाषण....लेखन...याचं क्रमाने परकीय भाषा शिकणे, आत्मसात करणे सोपे जाते. कोणाचेही विचार उधार घेण्यापेक्षा स्वतः विचार करणे हा भाषा शिक्षणातील महत्वाचा मुद्दा असल्याचे त्या म्हणाल्या. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्ता जगात भाषा या विषयात व्यवसाय व करिअरसाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत जसे की, दुभाषी, अनुवादक, पत्रकारिता, संवादलेखन इ. असे छान मार्गदर्शन शर्वरीताई यांनी केले .





**दि .१३ डिसेंबर २०२०, रविवार व्याख्यानमाला पुष्प २२ वे विषय .. निसर्ग संवर्धन वक्ते.. श्री धनंजय शेडबाळे**

🌱🌳 झाडाचे गुण घेऊ. झाडाचे गुण गाऊ 🌱🌳 ...याच tag line ला अनुसरून आपल्या स्वयंसेवी संस्थेमार्फत निसर्ग संवर्धनासाठी आणि पर्यावरणाची काळजी घेण्यासाठी अविरतपणे कार्य करणाऱ्या श्री धनंजय शेडबाळे सरांनी उपस्थितांशी अतिशय मनापासून संवाद साधला...

हरित वसुंधरा हेच एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्यांची संस्था गेली वीस वर्षे पर्यावरण आणि निसर्ग संवर्धन या क्षेत्रात काम करत आहे. यांअंतर्गत ...,

* यासाठी कायद्याने दिलेले अधिकार वापरून शासन दरबारी प्रयत्न करून वृक्ष संपदेची काळजी घेणे.
* सह्याद्रीत प्रचंड प्रमाणात देवराया आहेत, याची काळजी घेणे...निसर्गाच्या प्रत्येक घटकाची काळजी घेणे.
* पश्चिम घाटातील साधारण ३५%भाग देवराईने व्यापलेला आहे. याचे रक्षण करणे.
* अगदी गवतापासून ते मोठ्या वृक्षांचे रक्षण करणे, कारण निसर्गातील हे प्रत्येक घटक आपल्यासाठी कोणत्या ना कोणत्या प्रकारे महत्वाचाच आहे.
* घनवन उभे करणे (आतापर्यंत मानवनिर्मित अशी आठ घनवन त्यांनी यशस्वीपणे उभी केली आहेत)
* संस्थेतर्फे वेळू गावात वीस गुंठ्यांत असे मॉडेल संस्थेतर्फे सुरू केलं गेलंय.
* परसबागा फुलविणे, नर्सरी सेटअप, आत्मनिर्भर शेतकरी, seeds collection. असे विविध विधायक आणि प्रयोगशील उपक्रम संस्थेतर्फे राबवून समाजातील सर्वच घटकांना या वृक्ष संवर्धनाच्या महत्वाच्या कार्यात सामावून घेण्याचे कार्य ते आणि त्यांचे सहकारी या संस्थेमार्फत करत असतात.

* लॉक डाउनच्या काळात संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ तीन महिन्यात १३० प्रकारच्या बिया गोळा केल्या आहेत.... यातून




वीस लाख वृक्ष तयार करण्याचा मानस आहे . आपल्या व्यस्त दिनाक्रमातून वेळ काढून सरांनी या विषयावर अतिशय उत्तम मार्गदर्शन केले. याचबरोबर पालकसंघाच्या याच विषयाशी संबंधित उपक्रमात सहभागी व्हायला ही नक्कीच आवडेल असेही आवर्जून सांगितले . कार्यक्रमाच्या सुरुवातीला हर्षदा ताईंनी ओंकार आणि पद्य सादर केले. माधवी ताईंनी कार्यकर्माची प्रस्तावना केली.. सुशील दादांनी वक्त्यांचा परिचय करून दिला .. राजश्री ताईंनी शेवटी आभार मानून .. प्रिती ताईंनी प्रार्थनेने समारोप केला.

**सामुदायिक संपूर्ण गीता पठण दिनांक २७ डिसेंबर २०२० रोजी**

हा सामुदायिक संपूर्ण गीता पठणाचा कार्यक्रम संपन्न झाला. आ. भाऊंच्या अमृत महोत्सवापासूनत् यांच्याच प्रेरणने सुरू असलेल्या या कार्यक्रमाचे हे पाचवे वर्ष ...पण या वर्षी हा कार्यक्रम ऑनलाईन पार पडला.



मातृमंदिरात काही निवडक वाचकांच्या उपस्थितीत अत्यंत भावपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम झाला. ओंकार व श्लोक म्हंटल्यावर वाचनास सुरुवात झाली. निगडी केंद्राचे केंद्र प्रमुख मा. देवळेकर सर व मा. लिमये काका यांच्या हस्ते श्रीकृष्णाचे व गीतेचे पूजन झाले. बरोबर आठ वाजता पठण सुरू झाले. सौ. प्रतिभाताई दलाल व सौ. जोशी काकू या मुख्य वाचक म्हणून उपस्थित होत्या. पठण पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांनी पुष्प अर्पण केले. त्यानंतर गीतेची आरती झाली . त्यानंतर मा. लिमये काका यांनी मार्गदर्शन करताना गीतेच्या पंच प्राणा विषयी विशद केले. यामध्ये पहिला प्रयत्नवाद - कोणतेही काम करत असताना पूर्ण होईपर्यंत प्रयत्न केले पाहिजेत. आपले प्रयत्न जेवढे असतील तेवढे यश आपल्याला मिळणार आहे. दुसरे अहंकारनाश - सगळे मीच करत आहे ही अहंभावना सोडून मी एकटा करत नाही तर सर्व मिळून संघभावनेने काम करणे महत्वाचे होय. तिसरे भक्ति - कधी कधी काम करत असताना निराशा येते. तेव्हा परमेश्वर माझ्या पाठीशी आहे ही दृढभावना निर्माण झाली की निराशा आपोआप जाते. चौथे लोकसंग्रह - आपल्या बरोबरच्या लोकांना ज्ञान देऊन त्यांना उच्च पातळीवर घेऊन जाणे. म्हणजे खरा लोकसंग्रह होय आणि पाचवे व सर्वात महत्वाचे म्हणजे या चारही गोष्टींचा समनव्य साधून काम करता येणे. हे गीतेचे पंचप्राण प्रत्येकाने समजून घेऊन दृढ करायला हवे संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालनही सौ. प्रतिभाताई दलाल यांनी केले. आयोजनात सौ. वैशालीताई तळेगावकर , सौ. सुषमाताई कासार व सौ. राणीताई सोनवणे यांनी प्रतिभाताईंना सहकार्य केले. यासाठी सुमारे ८० जणांनी सहकुटुंब ऑनलाईन सहभाग नोंदवला .

**व्याख्यानमाला पुष्प २३ वे  दिनांक .. २७ डिसेंबर विषय  :  शाश्वत विकासासाठी जैव तंत्रज्ञान आणि बांबू संवर्धन**

**वक्त्या :  सौ संगीताताई कुलकर्णी (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संशोधिका )**

भविष्यवेधी... स्वप्नदर्शनी.. प्रतिभा.. आम्हा दे  .....! याच ओळींना सार्थ ठरवत ज्ञान प्रबोधिनी निगडी विभागाचा जैव



तंत्रज्ञान विभाग सतत प्रयोगशील  राहून आपल्या क्षेत्रात  नवनिर्मिताचा ध्यास घेऊन सतत कार्यरत आहे.. याचीच प्रचिती आजच्या वक्त्या संगीताताईंच्या उस्फूर्त  आणि माहितीपर व्याख्यानातून  येत होता. जैव तंत्रज्ञान आणि बांबू संवर्धन याबाबत त्यांनी अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितले. विविध जैवशास्त्राचा मानवी जीवनमान सुधारण्यासाठी केलेला उपयोग म्हणजे जैव तंत्रज्ञान होय  .

* सध्याचे भेडसावणारे प्रश्न म्हणजे... ऊर्जा, विषयुक्त अन्नघटकामुळे. पाणी , हवा  माती याचे प्रदूषण .

* पिकांवर मारलेल्या रासायनिक फवारणीमुळे वातावरणातील हवा प्रदूषित होतीये. याला पर्याय म्हणून हरित उपाय शोधणे म्हणजेच  औषधी स्प्रे, उदबत्यांचा वापर करणे

*  पर्यावरणाच्या समतोलातील मानवी हस्तक्षेप हे सुद्धा कोविडचे एक प्रमुख कारण असू शकते.

**बांबू संवर्धन  .....( हिरवे सोने )**

* ज्ञान प्रबोधिनीच्याजैव तंत्रज्ञान विभागाचे कार्य २०१४-१५ पासून चालू झाले. या कार्यात आपली संस्था अग्रस्थानी आहे.

* जैव तंत्रज्ञान विभागात ऊती संवर्धनापासून बांबूच्या लागवडी पर्यंत आपण पोहोचलो आहोत.

*  जगभरात बांबूच्या एकूण १००० च्यावर प्रजाती आहेत. त्यातील १४० प्रजाती भारतात आढळतात ..आणि  यातील १० प्रजातींवर  आपल्याकडे अभ्यास होतोय  .




*  गेल्या काही वर्षात आपल्या विभागात बांबूची सुमारे तीन लाख रोपे तयार झालेली आहेत

* जगभरात ९०% च्यावर उदबत्तीचा काड्या चीन आणि व्हिएतनाम वरून येतात. यालाच पर्याय म्हणून त्याचे उत्पादन   आपल्याकडे  घेण्यावर भर दिला जाणार आहे .

*  बांबूवर आधारित CNG प्रकल्प ही देशात लवकरच येतोय

* 😊 अस्पर या बांबूच्या जातीचे लोणचे लवकरच निगडी केंद्रात उपलब्ध होणार आहे (बचत गटांच्या माध्यमातून)

* भोर, वेल्हे येथे मुबलक प्रमाणात आढळणाऱ्या मेस या जातीचच्या बांबूवर संस्थेत काम चालू आहे (याची गुणवत्ता अतिशय उत्तम आहे)

* बांबू उत्पादन, त्यापासून विविध वस्तुनिर्मिती करण्यावर भर देऊन रूप पालटू देशाचे या ओळींपासून प्रेरणा घेऊन याविषयी जागरूकता आपल्या प्रयोगशाळेपासून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यत पोहोचविण्याचा संस्थेचा मानस आहे.

* भोर वेल्हे, मावळ येथील शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी अनेक बांबूची रोपे संस्थेतून नेली आहेत .... आणि यापासून तयार केलेल्या रोपांची अतिशय उत्तम लागवड झालेली आहे.

* Bamboo development foundation च्या मदतीने बांबूविषयी वेगवेगळे उपक्रम हाती घेतले आहेत.

* मुख्य म्हणजे विद्यालयातील सर्वचं पालकांनी या जैव तंत्रज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमात अवश्य सहभागी व्हावे.... हरित जीवन शैलीचा अंगीकार करावा असे अगदी मनापासून आवाहन केले .

* आनंदाची बातमी म्हणजे पुढील वर्षी आपल्या जैव तंत्रज्ञान संस्थेची द्विदशकपूर्ती होत आहे. यानिमित्ताने अनेक वेगवेगळ्या उपक्रमांचे , प्रदर्शनाचे आयोजन करण्याचा संस्थेचा मानस आहे .

आजच्या व्याख्यानाची सुरुवात ओंकार आणि पद्य म्हणून सौ मंजिरी ताईंनी केली ..प्रस्तावना सौ माधवी ताईंनी केली तर परिचय सौ राजश्री ताईंनी करून दिला ... आभाराचे काम सौ प्राची ताईंनी तर सौ चारुताताईंनी प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता केली .

**२८ डिसेंबर सोमवार वर्गमित्र उपक्रम**

या उपक्रमांतर्गत पालकांकडून( वर्गमित्र) वर्गातील मुलांशी विविध विषयांवर अतिशय मनमोकळा संवाद साधला जातो . त्याद्वारे त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जातात.... हसत खेळत वातावरणात मुलांना बोलते केले जाते .

वेगवेगळे खेळ खेळूले जातात (भाषा कौशल्य , सामान्य ज्ञान , गणिती खेळ) इ० ..याद्वारे मुलांची निरीक्षण शक्ती , विचार करण्याची क्षमता वाढीस लागते . अतिशय नियमितपणे हा विधायक उपक्रमाचे आयोजन होते .. विद्यालयातील संवेद विभाग आणि वर्गमित्र सौ स्नेहाताई देशपांडे , सौ तृप्तीताई दिकोंडा , सौ कविताताई पराळे , सौ प्राची ताई क्षीरसागर , सौ मंजिरीताई छापेकर हे सर्वजण यात नियमितपणे सहभागी असतात .

**पालक महासंघ आयोजित पालक - शिक्षक क्रीडा स्पर्धा २०२१** ⚽🏏🏈🏸⚾

भागवत संप्रदायात ज्याप्रमाणे पंढरीच्या वारीला जितके अनन्यसाधारण महत्व आहे आणि या सोहळ्याची वर्षभर जितक्या आतुरतेने वाट पाहिली जाते .... , तितक्याच उत्कंठेने विद्यालयातील दरवर्षी ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात होणाऱ्या *पालक महासंघ आयोजित पालक शिक्षक-क्रीडा स्पर्धेची वर्षभर उत्साही पालकांकडून वाट पाहिली जाते. 😊

यंदाचे क्रीडास्पर्धेचे हे ९ वे वर्ष ! कोविड सारख्या जगभरावर असलेल्या सार्वत्रिक संकटामुळे यावर्षी जिथे सगळीकडेच शाळा , महाविद्यालये ऑनलाईन पद्धतीने चालू असताना आणि सुरक्षेच्या आणि social distancing च्या नियमांचे पालन करताना मुळात खरं तर यावर्षी क्रीडा स्पर्धा घ्यायच्या की नाही इथपासून सुरुवात होती .. !

त्याच सुमारास मधल्या काळात (लॉकडाऊनच्या) पालक महासंघातर्फे श्री. देवळेकर सरांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उत्तमोत्तम विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन केले गेले आणि त्याला उत्तम प्रतिसाद ही मिळाला. याचबरोबर कोविडच्या प्रतिकूल काळातही असेच अनेक विधायक उपक्रम जसे की विद्यालयातील वैद्यकीय क्षेत्रातील पालकांकडून वैद्यकीय

मार्गदर्शन  पालक महासंघाकडून राबवले गेले...अशाच अनेक उपक्रमांपैकी  दरवर्षी उत्साहात साजरा होणारा म्हणजे आपला  क्रीडा महोत्सव !

***यावर्षी क्रीडास्पर्धा घ्यायच्या की नाही?**

***त्याचे स्वरूप कसे असावे?**




* मुळात स्पर्धा आयोजित केल्यास पालक दरवर्षी इतक्याच उत्साहात यात सहभागी होतील की नाही?

*शासनाची परवानगी मिळेल का?

*मैदानावर social distancing चे व्यवस्थित पालन होईल ना?

*गर्दीचे नियोजन करता येईल ना?

*दरवर्षी सारखा जोश, उत्साह, लगबग, मदतयंत्रणा (अर्थातच आपल्या पालकांची...सर्वात महत्वाचा घटक) या सगळया गोष्टी याही वर्षी मैदानावर बघायला मिळतील ना?

सुरुवातीला अशा असंख्य प्रश्नांचा डोंगरच उभा राहीला होता.... पण

एकाकी ही वाट नसावी

सन्मित्राची साथ असावी

स्वप्न उद्याचे सत्य बनविण्या शर्थ आम्ही करणार....

आपल्या प्रबोधनपद्याच्या या ओळी सर्वांनी (आपल्या पालक बंधू भगिनींनी)  निग्रहाने आचरणात आणून एकमेकांच्या साथीने , मदतीने आणि आत्मविश्वासाने याही वर्षी क्रीडा महोत्सव नेटका पण यशस्वी करून दाखवला ही गोष्ट विशेष उल्लेखनीय होय !दि.११ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या बैठकीत श्री. देवळेकर सर , श्री सचिन संकपाळ, सौ. प्रतिभाताई , श्री. मिलिंददादा, **सौ हर्षदाताई, श्री अरुणदादा** आणि इतर सहकाऱ्यांनी मिळून क्रीडा महोत्सवाच्या नियोजनासंबधी  बैठक घेतली ...या बैठकीत (सर्वच पालक खेळाडूंचा उत्साह लक्षात घेऊन)  क्रीडा महोत्सव छोट्या स्वरूपात (तेव्हाची बाहेरची अनिश्चित परिस्थिती पाहता) घेण्याचे निश्चित केले . याचवेळी....

*यावर्षी खेळाचे नियोजन कसे करावे? *कोणते खेळांना प्राधान्य द्यावे?

*सांघिक आणि वैयक्तिक खेळ कोणते घ्यावेत? मुख्य म्हणजे आपली संपूर्ण क्रीडा स्पर्धा ही सरकारी नियमाचे पालन करून पार पाडता यावी  ..*यात शाळेचे प्रतिनिधित्व करणारा संघ तयार करावा (श्री. देवळेकर सरांच्या सूचनेवरून) इ. मुद्दे या बैठकीत मांडले गेले.

आणि अशा रितीने अखेर...

बहुप्रतिक्षित क्रीडा स्पर्धेचे बिगुल वाजले. याच बैठकीत सर्वानुमते या वर्षीचे क्रीडा प्रमुख म्हणून श्री अरुण दादा मरळ आणि सौ हर्षदाताई माळी यांची अनुक्रमे पुरुष खेळ प्रमुख आणि महिला खेळप्रमुख म्हणून निवड केली गेली . अशा रीतीने खेळांच्या तारखा निश्चित झाल्यावर क्रीडाप्रेमींचा उत्साह द्विगुणीत झाला... बरेच महिने शांत आणि भकास



वाटणारे आपले मैदान पुन्हा एकदा नव्या जोमाने गजबजून गेले... मुलांच्याच बरोबरीने तेवढ्याच उत्साहाने पालकांनीही स्वतःहून मैदानावर उतरलेले पाहणे (अर्थातच खेळण्यासाठी 😊) यासारखे देखणे दृश्य नाही... सकाळच्या प्रसन्न वेळी तिथला उदंड उत्साह , चैतन्यदायी वातावरण , मैदानावरची (दर्दी) गर्दी यामुळे आपल्या इतर पालक बंधू भगिनींनाही मैदानावर उतरायचा मोह झाला नाही तर नवलच !



निरोगी सुदृढ शरीर संपदेची आणि उत्तम रोगप्रतिकारक शक्तीची सांगड घालण्यासाठी व्यायामाला , खेळाला , कसरतीला पर्याय नाही... याची प्रबोधिनीच्या सुज्ञ आणि सुजाण पालकांना नक्कीच जाणीव असल्यामुळे अर्थातच स्पर्धेच्या नावनोंदणीला चांगला प्रतिसाद मिळू लागला.... स्पर्धेत भाग घेण्यासाठी , सहभागासाठी पालक संघाकडून आवाहन केले जाऊ लागले.... प्रत्येक वर्गाच्या गटावर निरोप दिले गेले...(वातावरण निर्मितीसाठी गेल्या वर्षीच्या स्पर्धांची क्षणचित्रे म्हणून त्याचे videos पाठवले गेले ) आणि अशा रीतीने स्पर्धेचे , त्याच्या पूर्व तयारीचे जोरदार वारे वाहू लागले.... अर्थातच कोविड च्या पार्श्वभूमीवर स्पर्धेला यावर्षी दरवर्षीसारखा उदंड प्रतिसाद मिळणार नाही याची सर्वांनाच कल्पना होती.... परंतु काहीच न होण्यापेक्षा कुठेतरी एक सुरुवात तरी होतीये या नकारात्मक वाटावरणातून बाहेर पडण्यासाठी..... हीच आपल्या सर्वांसाठी खूप मोठी आणि उत्साह वाढवणारी गोष्ट होती हे मात्र खरं !!!



याच काळात आ. भाऊंनाही प्रकृतीअस्वास्थ्याच्या कारणाने रुग्णालयात दाखल करावे लागले ... साहजिकच सर्वत्र अतिशय चिंतेचे वातावरण होते... याच पार्श्वभूमीवर यावर्षीच्या स्पर्धा अतिशय साध्या पद्धतीने , कोणताही गाजावाजा न करता (बॅनर , जाहिराती , फॉर्म्स प्रायोजक या गोष्टी टाळून) घेण्यात येतील असे सर्वानुमते ठरले... याचबरोबरीने आ. भाऊंच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी सर्वांचीच प्रार्थना आणि उपासना ही चालू होती ...

**दि.२ आणि ३ जानेवारी रोजी पुरुषांच्या व्हॉलीबॉल आणि क्रिकेटच्या प्राथमिक स्पर्धा घेतल्या गेल्या .**

स्पर्धेच्या काळात पालक महासंघाच्या उद्योग विभागाच्या मदतीने आपल्याच पालकांचे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते (अर्थातच निवडक ...गर्दी टाळण्यासाठी ) याच्या नियोजनात श्री अर्जुन दादा दलाल आणि सौ अनुजाताई बनाळे व यांच्या सहकाऱ्यांचा मोलाचा सहभाग होता .

*दि ९ आणि १० जानेवारी या तारखा क्रीडा स्पर्धेसाठी निश्चित झाल्या होत्या परंतु भाऊंच्या तब्येतीच्या कारणामुळे त्या तारखा बदलून त्याच स्पर्धा दि १६ आणि१७ जानेवारी या दिवशी घेण्याचे निश्चित केले गेले....*

**दि १६ जानेवारीला सकाळी सात वाजता प्रमुख अतिथी . श्री. अभिजित लोंढे (Iron man स्पर्धेचे विजेते)** यांच्या हस्ते स्पर्धेचे औपचारिक उदघाटन झाले... याप्रसंगी मैदानावर स्पर्धेतील सर्व सहभागी उपस्थित होते ... प्रमुख



पाहुण्यांनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधून व्यायामाचे आणि खेळाचे महत्व पटवून सांगितले तसेच स्वतःचे Iron Man या स्पर्धेतील काही अनुभव ही सांगितले ...

अशारितीने सकाळच्या प्रसन्न वातावरणात स्पर्धांची सुरुवात झाली... स्पर्धेच्या दोन्ही दिवशी माईक हातात घेण्यापासून ते महिलांच्या स्पर्धांचे नियोजन करण्यात सौ प्रतिभाताई दलाल यांचा मोलाचा सहभाग होता हे पदोपदी जाणवत होते.. श्री पाचारणे सर आणि आपल्या काही पालकांनीच पंच म्हणून अतिशय उत्तमरीत्या काम केले.. ज्यांचा उल्लेख केल्याशिवाय ही स्पर्धा अपुरी राहील ते नाव म्हणजे श्री प्रसाददादा दगडे.... स्पर्धेचे चारही दिवस त्यांनी स्वतःला अक्षरशः झोकून देऊन छायाचित्रण आणि व्हिडिओ शूटिंगचे महत्वाचे काम पाहिले... केवळ ते आणि त्यांच्या सहकाऱ्यांमुळे( यात त्यांची लेक ही आघाडीवर होती हे कौतुकास्पद👏👏) हे क्षण आपल्याला पुन्हा पुन्हा अनुभवता येतील .(छायाचित्रांच्या रुपात)

बाहेरच्या अनिश्चित आणि अवघड परिस्थितीतही न डगमगता संपूर्ण स्पर्धेत सुमारे २५० च्या वर पालकांनी स्पर्धक म्हणून सहभाग घेतला ही..... विशेष उल्लेखनीय बाब होय !

दि१७ जानेवारी रविवारी संध्याकाळी क्रीडा स्पर्धेचा बक्षीस समारंभ संपन्न झाला ... याप्रसंगी सौ विद्याताई उदास , श्री गदादे सर , श्री बाळा शिंदे , श्री देवळेकर सर उपस्थित होते. याप्रसंगी सरांनी , विद्याताईंनी उपस्थितांशी मनमोकळा संवाद साधला.... सर्वांना मार्गदर्शन केले.... इतर अनेकांनी ही उस्फूर्तपणे स्पर्धेविषयी आपले मनोगत व्यक्त



केले.... याने कार्यक्रमात खूपच रंगत आणली ..


अशारीतीने सलग नवव्या वर्षी आपला क्रीडामहोत्सव थोडक्यात , आटोपशीर पण तितक्याच उत्साहाने , (तंटा विरहित , कोरोनामुक्त ) अतिशय खेळीमेळीच्या वाटवरणात साजरा झाला .

याच प्रसंगी २०२२हे पुढचे वर्ष हे स्पर्धेचे दहावे वर्ष म्हणून ते मोठ्या आणि आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात यावा अशी श्री देवळेकर सरांनी सर्वांसमोर कल्पना मांडली आणि त्या कल्पनेचे सर्वांनी आनंदाने स्वागत केले

याच्या नियोजनासाठी आणि  मोठ्या आणि वेगळ्या पद्धतीने तो  कसा साजरा करता येईल याविषयी सर्वांनी आपापल्या कल्पना मांडाव्यात याविषयी ही त्यांनी सर्वाना आवाहन केले.... या महोत्सवाच्या  नियोजनाची सुरुवात ही आतापासूनच सुरू झालेली आहे.... याच्या नियोजनात आणि आपल्या innovative कल्पना मांडणाऱ्या सर्व उत्साही  पालकांचे यासाठी स्वागत आहे ..

क्रीडा स्पर्धेचा उद्देशच मुळी पालक संपर्क वाढविणे आणि त्यांच्यातील गुण ओळखून काही इतर समविचार घेऊन त्यांना पालक महसंघात समाविष्ट करून घेणे असा आहे. अशा अनेक पालकांशी नेहमीचा संपर्क ठेवल्याने आणि आपल्याच वर्गातील कोण पालक कसे खेळले, त्यांनी काय काय मजा केली याबद्दल ची चर्चा गटामध्ये होऊ लागते आणि मग आपणही एकत्र येऊन आधी वैयक्तिक गरजा आणि नंतर समाजासाठी काही तरी करायला हवे अशी भावना वाढीस लागते. आपल्या अभिरुची नुसार जरी वेगवेगळे गट झाले जसे कि गिर्यारोहणाचा गट, सायकल गट, सामाजिक उपक्रम करणारा गट, शैक्षणिक कामात रुची असणारा गट, आरोग्य गट आणि आताच्या काळातील तंत्रज्ञान गट, तरी देखील एक मित्रत्वाची भावना जागी झाल्याने हरतर्हेने पालक एकमेकांची मदत करण्यास कधीही तयार असतात. क्रीडा स्पर्धा हा मजबूत पाया असल्याने पालक महासंघ ही संघटना म्हणून आणखी दृढ होत आहे याचा आनंद वाटतो.

**प्रक्रियेमधील वेगवेगळे टप्पे :**



**दि २७ जानेवारी रोजी  निगडी ते गोवा ही** ही सायकल सहल यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या पालकांचे अनुभव कथन  आणि त्यांचा सत्कार समारंभ झाला.. आजच्या या ताणतणावाच्या जीवन शैलीमध्ये सुद्धा स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊन प्रदुषण मुक्त निसर्गाचा ध्यास घेत तसेच केंद्र सरकारच्या फिट इंडिया संकल्पनेवर आधारित ज्ञान प्रबोधिनीच्या पालकांनी निगडी ते गोवा सायकल मोहिम 460 किलोमीटरचे अंतर तीन दिवसांत पूर्ण केले.



ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी शाळेच्या अंतर्गत पालक महासंघ पर्यावरण पूरक विविध उपक्रम करत असतो. त्यातील सायकल प्रवास हा एक पालकांसाठी उपक्रम होय. दरवर्षी डिसेंबर, जानेवारी मध्ये विषेश संदेश व अंतर निश्चित करुन पूर्ण केला जातो. या मोहिम मध्ये **श्री.कपिल धर्माधिकारी, श्री.राहुल चौधरी,** श्री.अरुण मरळ, श्री.सुनील पवार, श्री. सचिन कळसकर, श्री.संतोष दळवी, श्री.प्रमोद चव्हाण, श्री. शिवराज थोरात, श्री.महेश पवार, श्री.गणेश तरस,  श्री.प्रशांत नायर, श्री.जितेश बि-हाडे, श्री. दिनेश मालुसरे  हे पालक सहभागी झाले होते. या उपक्रमासाठी शुभेच्छा व  उत्कृष्ट मार्गदर्शन केंद्र प्रमुख मा.श्री देवळेकर सरांनी केले. दरवर्षी असेच संघटन करून  पर्यावरण पूरक विविध उपक्रम करण्याचा संकल्प केला आहे.

**७ फेब्रुवारी २०२१ वेल्हे अभ्यास दौरा**

ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक, मानसिक, भावनिक, शारीरिक गरजा ओळखणे व त्याप्रमाणे सकारात्मक पर्याय



उपलब्ध करून देणे कोणतीही गोष्ट न लागता तिच्या मानवी स्वभावाला अनुसरून प्रसार करणे यामागे सर्जनशील भूमिका सुवर्णा ताई यांची होती. आर्थिक जुळवणी, प्लॅनिंग, दूरदृष्टी, माणसं उभी करणे, त्यांचं प्रशिक्षण, सततचा फॉलोअप, शासन व बँकेचा फॉलोअप, येणाऱ्या अगणित अडचणींना सकारात्मक तोंड देणे व त्यासाठी लागणारा अनंत वेळ देणे. अशा अनेक अडचणींवर मात करून सुवर्णाताई डोंगराएवढं काम केलेलं बघून त्यांना प्रबोधिनीला व त्यांच्या कामाला मनापासून सलाम!.

एक गट गुंजवणे येथील ज्ञान प्रबोधिनीने बांधलेली विहीर पाहण्यास गेला होता. पाझरझरा असूनही  पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. जानेवारी ते जुलै पाण्यासाठी पाचशे ते सातशे मीटर उंच डोंगरावर जावे लागत होते. पाणी नसल्याने ग्रामस्थांनी जनावरे विकली होती. ही विहीर ज्ञान प्रबोधिनी व इनरव्हील क्लब निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने बांधली आहे. यात अर्जुन दादा व प्रतिभाताई यांची मोलाची साथ मिळाली.  राजगड पायथा परिसरात प्रबोधिनीने  अशा एकूण तीस विहिरी बांधल्या आहेत.




२७ फेब्रुवारी  २०२१  वेल्हे बचत गट विक्री स्टॉल उपलब्ध उपक्रम




वेल्हे व आजूबाजूच्या ग्रामीण भागात ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने बचत गटाची कामे २५ वर्षापासून सुरू आहेत. सध्या ५६ गावात मिळून २३६ गटातून ५००० पेक्षा जास्त महिला यात सहभागी आहेत. यातून तयार होणाऱ्या उत्तम दर्जाच्या पौष्टीक उत्पादनांचा विक्री स्टॉल आपण आपल्या निगडी केंद्रात पालक महासंघ उद्योग विभागाच्या मदतीने उपलब्ध करून दिला. अनुजाताई यांच्या



नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. वेल्हे भेटीनंतर सतत संपर्कात राहून याचे नियोजन केले. या स्टॉल्स ना १०० पेक्षा जास्त जणांनी भेट दिली व खरेदीही केली. यात डाळी, शेवया, हळद, इंद्रायणी तांदूळ, कुरडई यांचा समावेश होता. त्याचबरोबर पर्स, पिशव्या, गृहपयोगी सजावटीच्या वस्तूंचाही समावेश होता. तसेच वंचित गटासाठी लहान मुलांचे कपडे, साड्या, शालेय साहित्य, लहान मुलांची खेळणी, गोष्टींची पुस्तके इत्यादी वस्तूंचे संकलन विद्यालयाच्या पालक संघाकडून आणि अध्यापकांकडून करण्यात आले. व याला मिळालेला प्रतिसाद पाहता पुन्हा लवकरच अशा उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात आयोजन करूयात असाही मनोदय यावेळी व्यक्त करण्यात आला .

**१६ फेब्रुवारी आदरणीय भाऊ तथा वा. ना. अभ्यंकर यांचे देहावसन**

चांगल्या माणसाचा सहवास आणि त्यांचे विचार आपल्याला ध्येयाकडे जाण्यासाठी खूपच मार्गदर्शक ठरतात .आणि



आ. कै. भाऊ हे याचं मूर्तिमंत उदाहरण होय! आ. भाऊ म्हणजे चालतं बोलत विद्यापीठचं …त्यांच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकालाच त्यांच्या अनुभवाच्या , ज्ञानाच्या, मार्गदर्शनाच्या रूपाने परिसस्पर्शच लाभलेला आहे असच म्हणावे लागेल.. ज्ञानसाधनेला , उपासनेला अविरतपणे वाहून घेतलेल्या भाऊंच्या चेहऱ्यावर आणि आजूबाजूलाही अखंड तेजाची आणि सकारात्मकतेची स्पंदने सतत जाणवत राहायची ..! इथून पुढे देहरूपाने जरी आ. भाऊ आपल्यात नसले तरीही त्यांच्या शिकवणीच्या, तत्वांच्या, उदंड कार्याच्या आणि आठवणींच्या रूपाने सदैव ते आपल्याबरोबर राहतील हेच खरे !!! 🙏

दि.२५ फेब्रुवारी रोजी संध्या ५.०० ते ७.१५ यावेळेत निगडी केंद्रातील सर्व सदस्यांनी एकत्र येऊन कै. भाऊंना आदरांजली वाहिली. यातील प्रत्येकांच्या भाऊंविषयीच्या आठवणी आणि मनोगतें खूपच भावपूर्ण होती. यातून भाऊंच्या कार्याचे एकेक पैलू उलगडले जात होते.

**२० फेब्रुवारी शनिवार सखी गट आयोजित किल्ले तुंग ट्रॅक**

पालक संघाच्या सखी गटाच्या पुढाकाराने लोणावळ्याजवळील किल्ले तुंग येथे ट्रेकचे आयोजन केले गेले.

पालक संघाचेच सदस्य आणि दुर्ग अभ्यासक श्री निलेश दादा यांच्या मार्गदर्शनाखाली लोणावळा येथील किल्ले तुंग (कठीणगड) याची निवड केली. साधारण वीस जणांचा यात समावेश होता.. औपचारिक गप्पा, प्रबोधिनी पद्य व निलेश दादांकडून लोणावळा परिसरातील अनेक किल्ल्यांची माहिती घेत प्रवासाला सुरुवात झाली. सुरुवातीला रायवुड

पार्क येथील देवराईस जाताना भेट दिली  भेट दिली.  तिथे असणारे दुर्मिळ औषधी वृक्ष आणि ऐतिहासिक  वीरगळींची सतीगळींची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली .  यानंतर गडाच्या पायथ्याशी  पोहोचल्यावर गड चढताना आणि उतरताना कोणती काळजी घ्यायची याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.    गडावरील अनेक ऐतिहासिक संदर्भ देत त्यांनी गडाची माहिती सांगितली  . त्यांच्याबरोबरच श्री आनंद



दादा बिराजदार यांनीही सर्वांनाच उत्कृष्ट मार्गदर्शन केले. गड माथ्यावर श्री तुंग देवीचे छोटेखानी पुरातन मंदिर आहे. तिथून सह्याद्रीच्या डोंगर रांगा, अनेक किल्ले व पवनेच्या विस्तीर्ण जलाशय याचे विहंगम दृश्य बघण्यास मिळते. त्यानंतर गड उतरून खाली आलो. यानिमित्ताने अनेक पालक, पालक महासंघाची जोडले गेले हे विशेष. या ट्रेकच्या नियोजनाची जबाबदारी प्रिती ताई, अनुजाताई व माधवीताई यांनी पार पाडली.

**१ मार्च....  पालक महासंघ नोंदणी फॉर्म**

निगडी केंद्रात पालक महासंघातर्फे पाक्षिक व्याख्यानमाला ते क्रीडा महोत्सव  आणि असे बरेच वेगवेगळे उपक्रम पालकांसाठी नेहमीच आयोजित केले जातात . या उपक्रमात बऱ्याच पालकांना प्रत्यक्ष सहभाग आणि नियोजनात ही काम करण्याची इच्छा असते पण नेमका  संपर्क नसल्याने ते पुढे जाऊ शकत नाहीत.... आणि याचसाठी सर्वच पालकांना  एकत्रितपणे काम करण्यासाठी पालक महासंघाच्या सभासद नोंदणीसाठीचा  फॉर्म या दिवशी तयार करून सर्वच पालकांपर्यंत तो पोहोचवण्याची व्यवस्था केली गेली. आणि सर्व पालकांना हा फॉर्म भरण्यासाठी आवाहन केले गेले

**६ मार्च , शनिवार महिला दिनाचे औचित्य साधून कार्यकारिणीतील महिलांचा  अनौपचारिक कौतुक सोहळा**

या छोट्याश्या अनौपचारिक कार्यक्रमाचे निमित्त होते  ते येणारा महिला दिन ...! (इथे आपण आता आपल्या सोयीने महिला दिनाची पूर्वपूर्वसंध्या असं म्हणूयात.)  याप्रसंगी आदरणीय  श्री . देवळेकर सर,  पालक संघाचे अध्यक्ष श्री मिलिंद दादा , श्री आनंददादा , श्री प्रसाददादा आणि श्री निलेशदादा  ही अगदी आवर्जून उपस्थित होते हे विशेष !!

पालक संघात काम करणाऱ्या आपल्या सगळ्या महिला सदस्यांच्या कामाचे कौतुक म्हणून हा छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला गेला होता.  याप्रसंगी राजश्रीताई  कविताताई, अनुजाताई ,  माधवीताई ,   चारुताताई ,प्रितीताई,  मंजिरीताई, प्रियाताई , हर्षदाताई या सगळ्याजणी आवर्जून उपस्थित होत्या..  यावेळी  चार ओळींच्या वर्णनावरून ती  कोण ते ओळखा..  ? अशी  गंमतीदार प्रश्नमंजुषा आनंद दादांनी घेतली... यामुळे या अनौपचारिक बैठकीत खूपच




रंगत आली... 👍👍 यानिमित्ताने कोण कोणाला किती ओळखून आहे (अर्थातच चांगल्या गुणांच्या आधारे 😁) याची सुंदर झलक बघायला मिळाली...   पेन आणि मोगऱ्याचा सुगंधी गजरा अशी सुंदर सुगंधी भेट सगळ्या महिलांना देण्यात

आली ( पेनाचे प्रयोजन... आपल्याला पुढे पालक संघाची काय काय विधायक कामे करायची आहेत ? किती उद्दिष्टांची पूर्तता झाली आहे ..किती राहिली आहेत याची आठवणीने नोंद ठेवण्यासाठी ! आणि मोगऱ्याचा गजरा... एकत्रितपणे काम करताना असे आनंददायी सुगंधी क्षण मनात जपून ठेवण्यासाठी ...🖉 ❀)

यावेळी मिलिंददादा आणि आनंद दादांनी उस्फूर्तपणे आपले मनोगत व्यक्त केले ... एकत्रितपणे काम करताना महिलांच्या प्रत्येक उपक्रमात त्यांचेही मोलाचे सहकार्य असेलच हे ही आवर्जून सांगितले ..

आ. श्री देवळेकर सरांनी उपस्थित राहून सर्वांचाच उत्साह द्विगुणीत केला .यानिमित्ताने मार्गदर्शन करताना ते म्हणाले... प्रत्येक कार्य करताना जे झालंय ते बिंदूव्रत आणि राहिलंय ते सिंधूव्रत ..ही धारणा प्रत्येकाने अंगी बाळगायला हवी ...आणि यालाच अनुसरून वाटचाल करावी.. तसेच आपण स्त्री -पुरुष अशा स्पर्धेत न पडता तिथे संपूरकता असं म्हणायला हवं (म्हणजेच निसर्गाने स्त्री आणि पुरुष यांना स्वतंत्र क्षमता , गुण, वैशिष्ट्ये दिली आहेत ...

त्या त्या क्षमतांना... गुणवैशिष्ट्यांना अनुसरून वागायला हवे.. इथे कोणतीही स्पर्धा नसावी) असे अतिशय साजेसे आणि उत्तम मार्गदर्शन केले . महिला दिनाचे औचित्य साधून साजरा झालेला अनौपचारिक कार्यक्रम (कौतुक सोहळा) आम्हा सर्वांनाच खूप मोठा आनंद आणि यापुढील प्रत्येक कामासाठी उत्साह आणि ऊर्जा देणारा ठरला हे मात्र नक्की !!! 😊

१० मार्च महिला दिन विशेष२०२१ पालक महासंघ सखी गट आयोजित महिला दिन विशेष कार्यक्रम

आठ मार्च म्हणजेच जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव !

परकीय संस्कृतीतून आपल्याकडे आलेली ही संकल्पना ..पण मुळात जे जे सुंदर ते माझे घर अशी सर्वसमावेशक अशी



आपली संस्कृती असल्यामुळे... कशाचाही पूर्णपणे अव्हेर न करता.... आपली निरक्षीर विवेकबुद्धी जागृत ठेवून सगळ्यातल चांगलं ते वेचून... वाईट मात्र सोडून द्यायचं हा आपल्या संस्कृतीचा स्थायीभावच आहे! त्यालाच अनुसरून हा स्त्रीत्वाचा उत्सव आपणही कौतुकाने साजरा करतो.. कला, साहित्य, नाट्य, चित्रपट, विज्ञान, क्रीडा, राजकारण , समाजकारण ...क्षेत्र कोणतंही असो... अगदी पूर्वीपासून ते आजतागायत या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीचा वावर .. तिच्यातील सर्जनशीलता , कामाप्रती निष्ठा , जिद्द, अभ्यासू वृत्ती यामुळे या सगळ्याच क्षेत्रात तिचा यशाचा आलेख नेहमीच उंचावताना दिसतो... !!! अशाच काही वेगवेगळ्या क्षेत्रातील हिरकणीच्या कार्याचा मागोवा घेऊन त्यांचा प्रेरणादायी प्रवास अनुभवण्यासाठी आजच्या आपल्या सखी गटाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते..

काही लेख , ललित, कविता, अलक ..अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांचा यात समावेश होता.. याचबरोबर बाया कर्वे, पार्वतीबाई पेशवे, साधनाताई आमटे, सुषमा स्वराज , सई परांजपे , अरुणीमा सिन्हा , शांता शेळके यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणाऱ्या लेखांचे ही वाचन झाले.. या ऑनलाईन कार्यक्रमासाठी ८०+ इतकी उपस्थिती होती.

विशेष म्हणजे आपल्या आई पालकांबरोबरच आपल्या बाबा पालकांनीही यासाठी आवर्जून हजेरी लावली आणि भरभरून प्रतिसाद ही दिला हे विशेष कौतुकास्पद 🙏😊 असेच कार्यक्रम यापुढे ही आवर्जून आयोजित करावेत अशी मागणी ही आवर्जून आपल्या वैशालीताई तळेगावकर आणि रेवाताई कुलकर्णी आणि स्मिताताई माने आणि इतर श्रोत्यांनी ही केली . 🙏 कार्यक्रमानंतर राजश्रीताईंनी आपले मनोगत व्यक्त केले ..

या कार्यक्रमाचे नियोजन माधवीताई पोतदार , मयुरीताई जेजुरीकर , प्राचीताई क्षीरसागर , मंजिरी ताई छापेकर आणि राजश्रीताई ओझर्डे यांनी केले .. कार्यक्रमाची तांत्रिक बाजू चारुता ताईंनी सांभाळली.

कार्यक्रमाच्या प्रसिद्धीपासून कार्यक्रमात सहभागी होण्यापर्यंत पालक संघाचे अध्यक्ष श्री मिलिंद दादांचा महत्वाचा सहभाग होता ..

एप्रिल महिन्यात पालक संघातर्फे पालकांसाठी अभिवाचन कार्यशाळा घेण्याचे नियोजन आहे .. ती कार्यशाळा मयुरीताई जेजुरीकर घेणार आहेत ..याबाबत लवकरच माहिती दिली जाईल ..यासाठी नाममात्र शुल्क असेल . इच्छुकांनी यासाठी अवश्य नावनोंदणी करावी असे आवाहन ही उपस्थितांना केले गेले.

**१४ मार्च २०२१ ... लोहपुरुष स्पर्धा**

यादिवशी पालक महासंघाने अत्यंत अवघड अशा आयर्नमॅन ७०.३ ( लोहपुरुष स्पर्धा ) या स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये सहभागी स्पर्धकांना १.९ किमी स्विमिंग लगेचच ९० किमी सायकलिंग आणि नंतर २१ किमी रनिंग हे सगळं न थांबता सलग १०तासात पूर्ण करायचं होतं यासाठी २५ सहभागी स्पर्धक होते. . यासाठी क्रीडाकुलच्या प्रशिक्षक व वैद्यांनी त्यांना मार्गदर्शन केले. २५ पैकी १४ जणांनी ही. स्पर्धा पूर्ण केली. दोघांनी आंतरराष्ट्रीय निकषात (८ तास ३० मि.) स्पर्धा पूर्ण केली. तर अन्य ११ जणांनी भारतीय निकषात (१० तास) स्पर्धा पूर्ण केली. १४ मार्च रोजी सकाळी ६.३० ते सायं. ५ पर्यन्त ही स्पर्धा चालली.. याचे संपूर्ण आयोजन पालक महासंघाने केले. ७५ स्वयंसेवक दिवसभर यासाठी काम करीत होते . उत्कृष्ट नियोजन आणि संघटित शक्तीचा एक आविष्कार यात अनुभवायला मिळाला. या स्पर्धेसाठी






पालक संघाकडून आणि विद्यालयातील अनेक महिला आणि पुरुष पालकांकडून नियोजनासाठी उत्तम सहकार्य मिळाले .. जसे की सायकल स्पर्धा... श्री अरुणदादा मरळ .. धावणे स्पर्धा .. श्री महेशदादा राजपूत . ...पोहणे स्पर्धा .. श्री अनिरुद्धदादा नामजोशी श्री निलेशदादा गावडे , श्री. मुकुंद लोटके. तसेच याचे संपूर्ण चित्रीकरण ..श्री. प्रसाददादा दगडे आणि श्री सचिनदादा भगत ..विशेष योगदान.. श्री योगेशदादा थिटे आणि श्री सुहासदादा देशपांडे ..या सर्वांनीच मोलाची मदत केली .

**सहभागी स्पर्धक:**

• संदीप गोरे, रोहन शहा, विजय नाईक, आनंदकुमार बिराजदार, संतोष गिरंजे, शहाजी बारणे, संतोष नाईक, किशोर जाधव, नवनाथ नरळे, प्रशांत खैरनार, श्रीराम कुंटे, प्रीतम महाजन, शंकर घोलप, गुलाब वाल्हेकर, शैलेश शिंदे, दिगंबर पाटील, इंद्रजित पाटिल, नितीन बारणे, विलास खांडेकर, धनंजय म्हाळूंकर, सागर टेंबुगडे, लक्ष्मण भणगे, सचिन थिटे, डॉ राहुल वाणी, श्रद्धानंद वारे.

**१५ मार्च , जागतिक ग्राहक दिन**

ग्राहक हा बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल आणि खरेदी विक्रीचा केंद्रबिंदू आहे. याच दिनाचे औचित्य साधून ज्ञान प्रबोधिनी पालक महासंघाचा उद्योग विभाग आपल्यातील उद्योजक आणि व्यावसायिक पालक बंधू भगिनींचा उद्योग वाढीस लागावा, तो जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावा  या हेतूने पालक महासंघाची बिझनेस डिरेक्टरी सर्वच पालकांना पाठवली गेली. 'आपण आपल्या पालकांना नक्की संधी देऊयात. एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ. आपलेच पालक आपण अधिकाधिक समृद्ध करूयात. डिरेक्टरी मध्ये नाव टाकण्यासाठी किंवा असलेले update करण्यासाठी पुढील गोष्टी, खालील संपर्क प्रमुखांकडे पाठवावे ' ..  अशा रीतीने उद्योग विभागा तर्फे सर्व पालकांना आवाहन केले गेले. (Webadmin@jpnvnigdi.org)

**१८ मार्च २०२१ पालक महासंघ आणि आ. संचालक श्री गिरीशराव बापट भेट, मार्गदर्शन**

यादिवशी कार्यकारिणी सदस्य आणि संचालक यांची या वर्षातील पहिलीच प्रत्यक्ष औपचारिक बैठक आयोजित केली गेली होती. यावेळी पालक महासंघाच्या प्रत्येक विभागाने जसे की ...शैक्षणिक , सांस्कृतिक , व्याख्यानमाला औद्योगिक , क्रीडा , आरोग्य , सामाजिक , संघटन ...यासर्वच विभागाच्या प्रमुखांनी आपल्या विभागाने वर्षभरात कोणकोणतते उपक्रम घेतले... आणि त्यामध्ये काय काय काम केलं... अशा आशयाची मांडणी आ. संचालकांसमोर केली आणि आपापली मनोगते व्यक्त केली. यानंतर आ. संचालक श्री गिरीशराव बापट यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

याशिवाय  नेहमीप्रमाणे वर्गमित्र उपक्रम , **प्लास्टिक संकलन**  (यामध्ये परिसरातील अनेक सोसायटीच्या लोकांना या उपक्रमात सहभागी करून घेऊन याची व्याप्ती वाढविण्याचे कार्य ही पालक महासंघाचे अनेक सभासद आपापल्या पातळीवर करत आहेत) आणि साप्ताहिक कार्यकारिणीच्या बैठका ही नियमितपणे चालू आहेत .










**४ एप्रिल  रविवार पालक महासंघ आयोजित रुजवू पालक तत्व या विषयावर उमाताई बापट** यांचे व्याख्यान झाले .

 यामध्ये चिरपालकत्वाची संकल्पना सांगताना पालकत्व हा आयुष्यभराचा एक संस्कार आहे असे त्यांनी सांगितले .




*पालकांनी ही स्वतःमध्ये स्वयंशिस्त, सातत्य   बदलांना सामोरे जाणे, या गोष्टी अंगिकाराव्यात. घरातील कौटुंबिक नातेसंबंध  सामाजिक भान , पर्यावरणविषयक दृष्टिकोन या गोष्टी जपायला हव्यात .  पालकांनी पाल्या बरोबरच  स्वतःचा ही विकास जाणीवपूर्वक घडवावा असे ही त्या म्हणाल्या.
कार्यक्रमासाठी २८०+इतकी उपस्थिती होती . कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रिती ताईंनी पद्य सादर केले  वक्त्यांचा  परिचय हर्षदाताई तर प्रस्तावना प्रियाताईंनी केली अस्मिताईंनी समारोप आणि अभाराचे काम केले तर माधवीताईंनी प्रार्थनेने समारोप केला .

**अभिवाचन कार्यशाळा    (दि १७,१८, २४,२५ एप्रिल)**

पालक महासंघाने विद्यालयातील पालक, शिक्षक आणि युवक/युवती विभागासाठी अभिवाचन कार्यशाळा आयोजित केली होती .. यामध्ये आपल्याच विद्यालयातील नाट्यशिक्षिका आणि पालक असलेल्या सौ मयुरीताई जेजुरीकर यांनी मार्गदर्शन केले . अभिवाचन म्हणजेच भाषेवर ..आवाजावर संस्करण झालेले वाचन !  यासाठी कोणता शास्त्रीय अभ्यास करावा..? याचे तंत्र आणि मंत्र ... याचा कसा अभ्यास करावा ?  यातील बारकावे...याची उत्तम माहिती सहभागी प्रशिक्षणार्थींना दिली गेली .  यासाठी साधारण एकोणीस जणांची उपस्थिती होती . हे सत्र ऑनलाईन पद्धतीने पार पडले. याच्या आयोजनात प्रियाताई , माधवीताई , मिलिंददादांनी सक्रिय सहभाग नोंदवला .



ज्ञानप्रबोधिनी कोविड मदतकार्य हेल्पलाईन ( 8390458155) चे नियोजन

सध्याच्या या कठीण परिस्थितीत काळाची गरज ओळखून ज्ञान प्रबोधिनी मधील सर्व विभाग, युवक युवती विभाग, स्नातक संघ  आणि पालक महासंघ मिळून काही तरी मोठे सामाजिक  कार्य हाती घेण्याचे ठरवले
मे महिन्याच्या सुरुवातीला ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रात covid care Center सुरू करण्याचे ठरले.  आणि एप्रिल महिन्यातच यासाठी  नियोजनाचे कार्य मोठया प्रमाणात सुरू झाले.
यातील महत्वाच्या कामांचे नियोजन जसे की ..

* डॉक्टरांची, स्वयंसेवकांची टीम तयार करणे, डॉक्टर गटाला मदत करणे.

* रक्त जमा करणे (यासाठी रक्तदान शिबिराचे नियोजन) * प्लाझ्माचे नियोजन करणे.

* रुग्णांसाठी डबे पुरविणे (याचे नियोजन) * रुग्णांसाठी समुपदेशन केंद्र सुरू करणे.

* लसीकरण * या कार्यासाठी पोस्टर्स, मेसेज, फ्लायर्स तयार करणे (Digital work)

* या सर्व कामासाठी स्वयंसेवक म्हणून आपल्या पालकांची मोठी फळी निर्माण करणे.

अशा प्रकारे स्नातक संघाच्या पुढाकाराने सुरू झालेल्या या विधायक उपक्रमात पालक महासंघ ही विविध पातळीवर कार्यरत झालेला आहे .या मध्ये स्नातक संघाने संपूर्ण उपक्रमाची जबाबदारी घेतलेली आहे, पालक महासंघ , युवती विभाग संपर्क प्रमुख आहेत आणि युवक विभाग प्रामुख्याने रक्तदान, प्लाझ्मा दान, लसीकरण इत्यादी चे नियोजन करत आहे. यात सर्व विभागातील डॉक्टर गटाची मोलाची मदत लाभत आहे. निगडी केंद्रातील सर्व विभाग मिळून सुरू झालेले हे संघटनात्मक सामाजिक काम लवकरच १ मे , भाऊंच्या जन्मदिनापासून कार्यरत होत आहे...याचा विशेष आनंद वाटतो. 🙏




सध्याच्या बिकट परिस्थितीमध्ये नागरिकांना मदतीचा हात पुढे करण्यासाठी व प्रशासनाला कोरोना विरुद्ध लढाईत साथ देण्यासाठी, ज्ञानप्रबोधिनी परिवाराने कोविड मदतकार्य 2021 हा उपक्रम हाती घेतला आहे! कोविड केअर विलगीकरण,



लसीकरण, टेस्टिंग, टेलिमेडिसिन, रक्त-प्लाज्मा, घरपोच जेवणाचा डबा अश्या विविध पातळीवर कार्य सुरु आहे. या मध्ये पालक महासंघ , स्नातक संघ , युवती विभाग संपर्क प्रमुख आहेत आणि युवक विभाग प्रामुख्याने रक्तदान, प्लाझ्मा दान, लसीकरण, अँटीजन टेस्ट इत्यादीचे नियोजन करत आहे . यात सर्व विभागातील डॉक्टर गटाची मोलाची मदत लाभत आहे. या उपक्रमात आपले बहुसंख्य पालक मोलाची मदत करत आहेत.. हेल्पडेस्क, पोस्टर बनविणे दूरध्वनीवरून पालकांची चौकशी करणे, त्यांना या मदतकार्याची माहिती देणे, यासाठी आर्थिक मदत उभी करणे, घरोघरी डबे पुरविणे यात पालकांचा विशेष सहभाग आहे

***पहिली ते सातवी उन्हाळी शिबिर***

पालक महासंघ, संवेद विभाग आणि मुक्तीसोपान विभाग यांच्या एकत्रित प्रयत्नातून **दि २६ एप्रिल ते १४ मे** असे उन्हाळी शिबिर घेण्यात आले... कोविडच्या पार्श्वभूमीवर मुलांना खऱ्या अर्थाने या ही वर्षी घराबाहेर पडून सुट्टीचा आनंद घेता येणार नव्हता.. म्हणूनच घरबसल्या मुलांची करमणूक व्हावी.... त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळावं... त्यांच्या कृतीशिलतेला चालना मिळावी या उद्देशाने हे शिबिर आयोजिले गेले होते.. यामध्ये पहिली ते सातवीच्या मुलांसाठी त्यांच्या वर्गाच्या गटावर वाचन, पाठांतर संकलन , कृती या चार गोष्टींवर आधारित वेगवेगळे उपक्रम पाठवले गेले. यामध्ये कविता करणे, अभिवाचन, पुस्तक वाचन, कोडी सोडविणे, पद्य गायन, श्लोक पाठांतर, पत्रलेखन , प्रवासवर्णन कार्यानुभव(यामध्ये घरातील कामात, स्वयंपाकात मदत ) असे अनेक उपक्रम दिले गेले..आणि यावर आधारित स्पर्धा ही

घेतल्या. मुलांनी या उपक्रमास छान प्रतिसाद दिला .. मुलांचे कौतुक आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नंतर या स्पर्धेतील  विजेत्या आणि सहभागी मुलांना ही प्रशस्तीपत्रके देण्यात आली

यामध्ये प्रत्येक वर्गाचे पालक प्रतिनिधी, प्रत्येक इयत्तांचे समन्वयक आणि संवेद आणि मुक्तीसोपन विभागातील सदस्यांनी यासाठी एकत्रितपणे काम केले .

**पालकत्व कार्यशाळा दि १, ८, १५ मे**

पालक महासंघ आणि संवेद विभाग आयोजित या कार्यशाळेत **उमाताई बापट** यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी ३० पालकांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये उत्तम पालक म्हणून स्वतःला घडविताना प्रथमतः  स्वतःमध्ये कोणते बदल अपेक्षित आहेत... त्याची पूर्वतयारी, अभ्यास, याचे समग्र विश्लेषण केले गेले.. पालकत्व हे काही काळापुरते मर्यादित बसून ते चिरपालकत्व असते  यासाठी वेळोवेळी बदलांचा स्वीकार करणे, स्वतःमध्ये साजेसे बदल घडविणे, मुलांचे शांतपणे ऐकून घ्यायला शिकणे, एकमेकांशी  सुसंवाद साधणे ...इत्यादी अनेक मार्गदर्शक गोष्टी सांगितल्या गेल्या

**.हास्यरंग व्याख्यानमाला  दि. २, ९, १६, २३, ३० मे**

गेले वर्षभर पालक संघातर्फे वेगवेगळ्या  विधायक विषयांवर आधारित व्याख्यानाचे सत्र चालू आहे... याच श्रृंखलेतील पुढचे व्याख्यान म्हणजेच  मे महिन्यात  हास्यरंग विशेष व्याख्यान होय... मे महिन्याच्या प्रत्येक रविवारी हास्य  या विषयाला अनुसरून अनेक उपक्रम घेतले गेले... यामध्ये खालील ५ हास्याची पुष्पे गुंफली.

**२ मे**

आपलेच **पालक डॉ श्रीकृष्ण जोशी** यांचे जीवनातील हास्याचे महत्व या विषयावर व्याख्यान झाले. , यामध्ये बोलताना ते



म्हणाले 'जीवनातील अडीअडचणी, दुःख, यावर एकमेव रामबाण औषध म्हणजे हास्य होय. आयुष्यात आनंदाचे, हास्याचे, विनोदाचे क्षण आपल्यला वेचता  यायला हवेत.. जीवनात सकारात्मक दृष्टिकोन महत्वाचा..! विनोदामुळे माणसं एकत्रि येऊन मनाने जोडली जातात ! या ऑनलाईन व्याख्यानाला १३०इतकी उपस्थिती होती .

**९ मे**



या सत्रात आपलेच  पालक **श्री व सौ दिकोंडा** यांनी श्री योगेश सोमण यांच्या विनोदी कथेचे अभिवाचन केले...यामध्ये एका मध्यमवर्गीय कुटुंबातील रोजच्या जीवनातील गंमती-जमती, चहाच्या पेल्यातील वादळ, खुमासदार प्रसंग  ...याचे अतिशय सुंदर चित्रण त्यांनी अतिशय रंजकतेने   सर्व श्रोत्यांसमोर मांडले ...आणि सर्वांना  मनापासून खळखळून हसायला लावले.. यासाठी १४५ जणांची ऑनलाईन उपस्थिती होती .

**१६ मे**

विनोदी कथा, कविता सादरीकरण मैफल - या ही सत्रात आपल्याच पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी खुमासदार किस्से, नर्मविनोदी कथा, मिश्किल कविता  सादर केल्या.. ही आपली  मैफल उपस्थितांना  हास्यरसाचा निर्भेळ आनंद देऊन गेली .

**२३ मे विनोदी सादरीकरण**




यामध्ये ही नेहमीप्रमाणेच आपल्याच पालकांनी उस्फूर्तपणे विनोदी सादरीकरण केले... घेतली का? , ड्रायविंग क्लास, ती फुलराणी, ऑनलाईन लग्न, ऑनलाईन गेट-टूगेदर, आजींची मुंबई सफर, वधूपरिक्षा असे अनेक विनोदी फार्स यात सादर केले गेले. या कार्यक्रमाला ९०+ इतकी उपस्थिती होती .

**३० मे विनोदी अभिवाचन**

या सादरीकरणात पुलंचे बटाट्याची चाळ, प्रभावळकरांचे हसगत असं दर्जेदार आणि काही स्वलिखित अभिवाचन झाली.... आपल्या या  गुणी आणि हौशी पालक  कलाकारांनी आपल्या रंगतदार  सादरीकरणाने यात अगदी  धमाल आणली ..🎭📖     यानिमित्ताने आपल्यातील काही नवनवीन कलाकारांची (कल्लाकारांची  असंच म्हणायला हवं खरं तर) आपल्या सर्वांनाच नव्याने ओळख झाली हे विशेष.!! .😊 गेले चारही रविवार आपण सर्वांनी यानिमित्ताने अगदी हसत खेळत आनंदाने घालवले...  प्रत्यक्ष सादरीकरणाचा आनंदच जरी वेगळा असला तरीही बाहेरच्या परिस्थितीमुळे आपण हे सगळेच कार्यक्रम




ऑनलाईन पद्धतीने घेतले ... यामध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करून सगळ्या सहभागिनीं उत्साहाने आणि नेटाने हा कार्यक्रम यशस्वी करून दाखवला. 👏👏  आ. देवळेकर सरांनीही त्यांच्या व्यस्त दिनाक्रमातून वेळ काढून आपल्या पालकांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्णवेळ हजेरी लावली..🙏

बाहेरची परिस्थिती निवळल्यावर लवकरच या सगळ्या  कार्यक्रमांचे पालकांसाठी आणि मुलांसाठी  आपण मनोहर सभागृहात पुन्हा एकदा आयोजन करू... असे सांगून सर्वांचाच उत्साह द्विगुणीत केला..

आजच्या कार्यक्रमासाठी ६४+ इतकी उपस्थिती होती .

**इंग्रजी संभाषण वर्ग (४ मे )**

आपल्या पालक संघातर्फे इंग्रजी संभाषण वर्गाचे (आपल्या महिला पालकांसाठी )आयोजन केले गेले आहे.. साधरण ४ मे पासून याची सुरुवात झाली आहे.. पालक संघाच्या सदस्या प्रितीताई ससे हा वर्ग घेत आहे. या वर्गाद्वारे उत्तम इंग्रजी संभाषण कौशल्य आणि इंग्रजी व्याकरण या विषयावर त्या सहभागीना उत्तम मार्गदर्शन करत आहेत.

**पद्य वर्ग - प्रबोधन पद्य**

हा तर प्रबोधिनी कुटुंबातील सर्वच लहानथोरांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय...!!!

आणि हीच प्रबोधन पद्य आपल्या पालकांना माहीत असावीत... ती नीट शिकता आणि म्हणता यावीत.. त्याचा योग्य अर्थ समजावा याच हेतूने आपण पालक संघाच्या वतीने या प्रबोधन पद्य वर्गाची सुरुवात केली..यामध्ये आपल्या अनघाताई देशपांडे आणि सायलीताई सर्व सहभागीना मार्गदर्शन करत आहेत.. सद्या आठवड्यातून एक दिवस या ऑनलाईन पद्य वर्गाचे आयोजन होते . या वर्गासाठी ५२ जणांचा एक गट तयार झाला आहे.

## पालक महासंघ वार्षिक (२०२०-२१) अर्थकारण

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ हे सर्वांसाठी अतिशय खडतर गेले, बऱ्याच पालकांवर मानसिक तसेच हॉस्पिटलचा आर्थिक ताण होता, त्यातच नोकरी, उद्योगांमधील घसरण !! हि सर्व परिस्थिती लक्षात घेता, काही पालकांसाठी आपण फी साठी आणि त्यांच्या नित्य जगण्यासाठी आर्थिक आवाहन करत असताना, पालक महासंघ समितीने देखील आपल्याकडील आर्थिक निधी योग्य प्रकारे वापरूया असा निर्णय घेतला. त्याप्रमाणे या वर्षी आहे त्या निधीमधून, वेळप्रसंगी आपल्या खिशातून समितीने खर्च केला. कमी खर्चातूनही चांगले उपक्रम होऊ शकतात हे माझ्या समितीने दाखवून दिले आणि निधीसाठी कधीही तक्रार केली नाही. काही उपक्रम करताना खर्च हा अटळ होता त्याप्रमाणे आपणा सर्वांसाठी हा जमा खर्च मांडत आहे.



# ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी केंद्र

## पालक महासंघ

## आर्थिक वर्ष सन २०२०-२१ जमा खर्च

| अनु क्र | तपशील | जमा शाळा | खर्च शाळा | जमा रोख | खर्च रोख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | आरंभीची शिल्लक 28 जुन - 2020 रोख रु | 54,485 | - | 4,587 | - |
| 2 | हार व फुले - पालक समिती हस्तांतरण सोहळा | | | | 930 |
| 3 | क्रीडा स्पर्धा | | | 21,400 | 26,810 |
| 4 | शोधबोध - क्रीडा स्पर्धा | | 3,200 | | |
| 5 | सेवकांचा खर्च - क्रीडा स्पर्धा | | 4,000 | | |
| 6 | अभिवाचन कार्यशाळा | | | 2,200 | 1,400 |
| 7 | पालक महासंघ T-Shirt छपाई व इतर खर्च | | 25,000 | | |
| 8 | प्रशस्तीपत्र व वार्षिक अहवाल छपाई | | | | 5,000 |
| 9 | अध्यक्षांकडून जमा | | | 5,953 | |
| | **एकूण** | **54,485** | **32,200** | **34,140** | **34,140** |
| | **25 जून 2021 अखेर एकून शिल्लक / (खर्च)** | **22,285** | **-** | **0** | **0** |

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वार्षिक उपक्रम यादी

1. दि २१ जून योगदिन
2. दि २८ जून - पालक महासंघ हस्तांतरण सोहळा
3. दि ५ जुलै गुरुपौर्णिमा - मदतीचा हात तुमच्यासाठी खास
4. दि १२ जुलै व्याख्यान - प्रबोधिनीत मला भेटलेले गुरू - मा. देवळेकर सर (केंद्र प्रमुख, ज्ञान प्रबोधिनी निगडी)
5. दि. १७ जुलै २०२० रोजी सखी गटाची बैठक . कथ्थक नृत्यांगना पायल ताई गोखले
6. दि १८ जुलै - संघटन गट चर्चा
7. दि १९ जुलै २०२० - वर्गमित्र संकल्पना
8. नियमित प्लास्टिक संकलन
9. दि १९ जुलै २०२० वक्ते.. श्री आदित्यदादा शिंदे - विषय.. चिपळूण येथील कामाचे निवेदन

10. दि २५ जुलै - ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया
11. दि २६ जुलै - व्याख्यान १५ - डॉ. धनंजय केळकर - गप्पा कोरोनावर
12. दि ३० जुलै गुरुवार "Thursday Thoughts"
13. दि २१ जुलै २०२० - श्रावणधारा नियोजन
14. दि ८ ऑगस्ट - एक मिनिटाचा खेळ
15. दि ९ ऑगस्ट व्याख्यान १६ - मी , माझे कुटुंब आणि कायदा - सौ. प्रतिभाताई जोशी दलाल
16. दि १५ ऑगस्ट – वेब site
17. दि. २० ऑगस्ट ज्ञान प्रबोधिनी - कार्यदिशा परिचय - श्री आदित्य दादा शिंदे
18. केंद्र गणेशोत्सव नियोजन आणि उपक्रम
19. दि २२ ऑगस्ट - पारंपारिक प्रसाद
20. दि २३ ऑगस्ट अथर्वशीर्ष पठण
21. दि २३ ऑगस्ट प्रश्नमंजुषा
22. दि २५ ऑगस्ट - पालक महासंघाच्या वतीने श्रींची आरती
23. सप्टेंबर २०२० - गीता रहस्य वाचन उपक्रम
24. १३ सप्टेंबर - पालक महासंघ - व्याख्यानमाला, पुष्प १७ - विषय आर्थिक नियोजन आणि गुंतवणूक पर्याय
25. १५ सप्टेंबर - रिक्षा, टेम्पो काकांसाठी मदतीचे आवाहन
26. १७ सप्टेंबर - कोरोना मदतकेंद्र (Corona helpline)
27. दि १८ सप्टेंबर - सखी गट (मासिक बैठक ) वक्त्या - सौ अनघाताई देशपांडे - विषय: ज्ञान प्रबोधिनी युवती विभाग
28. २७ सप्टेंबर - पालक महासंघ - व्याख्यानमाला, पुष्प - १८ वक्ते- मा.विनोद बोधनकर, विषय - प्लास्टिक, पर्यावरण व कोरोना
29. ३० सप्टेंबर - गुगल कलासरूम अध्यापक आणि पालक प्रशिक्षण
30. प्रकाशगाणी
31. ४ ऑक्टोबर २०२० रविवार व्याख्यानाचा विषय... व्यक्तिमत्त्व विकसनाचे पैलू वक्ते..... श्री.आदित्यदादा शिंदे
32. दि ११ ऑक्टोबर , रविवार व्याख्यान :भारत-चीन संघर्ष वक्ते: माजी विंग कमांडर श्री किरणजी पळसुले
33. वृत्त १५ ऑक्टोबर मोडी लिपी प्रशिक्षण
34. १६ ऑक्टोबर सखी गट ..व्याख्यान वक्त्या ... सौ मानसीताई बोडस विषय: वेळेचे नियोजन
35. दि २१ ऑक्टोबर बुधवार विषय: चाळिशी नंतरचे महिलांचे आरोग्य
36. दि २३ ऑक्टोबर , शुक्रवार *सखी गट आणि पालक महासंघ आयोजित महाभोंडला आणि स्तोत्र पठण
37. १ नोव्हेंबर २०२० पालक महासंघाच्या व्याख्यान श्री योगेशजी सोमण - कला क्षेत्रातील आव्हाने आणि संधी
38. ५ नोव्हेंबर २० व्यक्तिमत्त्व विकसनाचे अनेकविध पैलू - मा. शिवराजदादा पिंपुडे
39. १० नोव्हेंबर , रविवार विषय.. पाककृती मार्गदर्शन वक्त्या... सौ शोभा श्रीकांत
40. २२ नोव्हेंबर , रविवार , २०२० प्रतिज्ञाग्रहण ..निगडी केंद्र मार्गदर्शक ..आ.श्री गिरीशराव बापट
41. २९ नोव्हेंबर २० मानवी जीवनातील भाषेचे महत्व - सौ. शर्वरीताई ताथवडेकर
42. १३ डिसेंबर पालकसंघ व्याख्यान - निसर्ग संवर्धन वक्ते.. श्री धनंजय शेडबाळे

43. सामुदायिक संपूर्ण गीता पठ दिनांक २७ डिसेंबर २०२० रोजी मातृमंदिर
44. २७ डिसेंबर २०२० शाश्वत विकासासाठी जैव तंत्रज्ञान आणि बांबू संवर्धन - सौ संगीताताई कुलकर्णी
45. २८ डिसेंबर सोमवार वर्गमित्र उपक्रम
46. पालक महासंघ आयोजित पालक - शिक्षक क्रीडा स्पर्धा २०२१
47. ७ फेब्रुवारी २०२१ वेल्हे अभ्यास दौरा
48. २० फेब्रुवारी शनिवार सखी गट आयोजित किल्ले तुंग ट्रॅक
49. २७ फेब्रुवारी २०२१ वेल्हे बचत गट विक्री स्टॉल उपलब्ध उपक्रम
50. १ मार्च.... पालक महासंघ नोंदणी फॉर्म
51. ६ मार्च , शनिवार महिला दिनाचे औचित्य साधून कार्यकारिणीतील महिलांचा अनौपचारिक कौतुक सोहळा
52. १० मार्च महिला दिन विशेष२०२१ पालक महासंघ सखी गट आयोजित महिला दिन विशेष कार्यक्रम
53. १४ मार्च २०२१ ...लोहपुरुष स्पर्धा
54. १५ मार्च , जागतिक ग्राहक दिन - पालक महासंघाची बिझनेस डिरेक्टरी
55. १८ मार्च २०२१ पालक महासंघ आणि आ. संचालक भेट.
56. ४ एप्रिल रविवार पालक महासंघ आयोजित रुजवू पालक तत्व या विषयावर उमाताई बापट यांचे व्याख्यान
57. अभिवाचन कार्यशाळा ( दि १७,१८, २४,२५ एप्रिल )
58. ज्ञानप्रबोधिनी कोविड मदतकार्य हेल्पलाईन ( 8390458155) चे नियोजन
59. *पहिली ते सातवी उन्हाळी शिबिर*
60. पालकत्व कार्यशाळा दि १, ८, १५ मे
61. हास्यरंग व्याख्यानमाला २ मे - डॉ श्रीकृष्ण जोशी
62. हास्यरंग व्याख्यानमाला ९ मे - श्री व सौ दिकोंडा
63. हास्यरंग व्याख्यानमाला १६ मे - विनोदी कथा, कविता सादरीकरण मैफल
64. हास्यरंग व्याख्यानमाला २३ मे विनोदी सादरीकरण
65. हास्यरंग व्याख्यानमाला ३० मे विनोदी अभिवाचन
66. इंग्रजी संभाषण वर्ग (४ मे )
67. पद्य वर्ग - प्रबोधन पद्य

***संपूर्ण वृतांत वाचल्याबद्दल, धन्यवाद. आपला प्रतिसाद पालक महासंघ कार्यकारिणी सदस्यांना नक्की कळवावा.***

धन्यवाद,

मिलिंद धारवाडकर आणि कार्यकारी समिती,

पालक महासंघ






ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय,
पालक महासंघ आयोजित
अभिवाचन कार्यशाळा
१७, १८, २४ आणि २५ एप्रिल २०२१
सहभाग प्रमाणपत्र
अभिवाचन कार्यशाळेत सहभाग घेतल्याबद्दल
सौ. मधुरा जोगळेकर
आपले हार्दिक अभिनंदन
सौ माधवी पोतदार
(सांस्कृतिक विभाग प्रमुख)
सौ मयुरी जेजुरीकर
(प्रशिक्षक – अभिवाचन)
सौ प्रिया माजगावकर
(अभिवाचन कार्यशाळा सहाय्यक)
मा. श्री मनोजराव देवळेकर
(निगडी केंद्र प्रमुख)
श्री. मिलिंद धारवाडकर
(अध्यक्ष, पालक महासंघ)


ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय
पालक महासंघ आयोजित
व्याख्यानमालेत वक्ते म्हणून सहभागी झालात, दि. १३ सप्टेंबर २०२० रोजी
" आर्थिक नियोजन आणि गुंतवणूक पर्याय " या विषयावर श्रोत्यांना
आपल्या अमुल्य मार्गदर्शनाने समृद्ध केल्याबद्दल
श्री सुशील मोरे
आपले मन:पुर्वक आभार
श्री. मनोज देवळेकर
ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्र प्रमुख
श्री. मिलिंद धारवाडकर
अध्यक्ष, पालक महासंघ
सौ. चारुता देशपांडे
व्याख्यानमाला प्रमुख


ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय,
पालक महासंघ आयोजित – क्रीडा स्पर्धा २०२०-२१
★ प्रशस्ती पत्रक ★
१ मिनिट क्रीडा स्पर्धेत आपला व्हिडियो पाठवून
बॅट वर चेंडूचा टप्पा झेलणे क्रीडा प्रकारात सहभाग
घेतल्याबद्दल व पहिल्या क्रमांकाने विजय मिळवल्याबद्दल
श्री. सुजित जोग
आपले हार्दिक अभिनंदन !!
( २ सप्टेंबर २०२० )
SURYA NAMASKAR
श्री. अरुण मरळ
(क्रीडा प्रमुख)
श्री. आनंद देशमुख
(क्रीडा प्रमुख)
सौ. हर्षदा माळी
(क्रीडा प्रमुख)
श्री. मिलिंद धारवाडकर
(अध्यक्ष, पालक महासंघ)
मा. श्री मनोजराव देवळेकर
(निगडी केंद्र प्रमुख)


ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय,
पालक महासंघ आयोजित
प्रश्नमंजुषा स्पर्धा २०२०-२१
★ प्रशस्ती पत्रक ★
लोकमान्य टिळकांचे स्मृती शताब्दी वर्ष आणि गणेशोत्सव असे
औचित्य साधून आयोजित केलेल्या दूरस्थ (virtual)
प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांकाने विजयी झाल्याबद्दल
सौ. अलका पाटील
quiz
आपले हार्दिक अभिनंदन !!
( ३० ऑगस्ट २०२० )
श्री. निलेश गावडे
(गणेशोत्सव सहायक प्रमुख)
सौ. प्रतिभा दलाल
(गणेशोत्सव समिती सदस्य)
सौ. प्राची क्षीरसागर
(गणेशोत्सव स्पर्धा प्रमुख)
श्री. मिलिंद धारवाडकर
(अध्यक्ष, पालक महासंघ)
मा. श्री मनोजराव देवळेकर
(निगडी केंद्र प्रमुख)



“शक्तीची सर्वांनी करुनी उपासना , स्नेह आणि सहकार्याची करूया जोपासना,

परस्पर आदराचा येईल मग पूर !!”





“एकाकी ही वाट नसावी, सन्मित्रांची साथ असावी,

स्वप्न उद्याचे सत्य बनविण्या शर्थ आम्ही करणार”